सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

## ग्राम विकास विभाग

# राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण



# महा आवास

## त्रैमासिक

@MAHAAWAAS www.mahaawaas.com

जुलै ते सप्टेंबर २०२२



नागपूर येथे मा. उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, श्री. देवेंद्र फडणवीस यांचे शुभहस्ते महा आवास अभियान पुरस्कार वितरण



नाशिक येथे मा. मंत्री, ग्रामविकास, श्री. गिरिश महाजन यांचे शुभहस्ते महा आवास अभियान पुरस्कार वितरण



मा. मंत्री, वने, सांस्कृतीक कार्य व मत्सव्यवसाय, श्री.सुधीर मुनगंटीवार यांचे शुभहस्ते महा आवास अभियान पुरस्कार वितरण



धुळे येथे मा.मंत्री, बंदरे आणि खनिकर्ण, श्री. दादाजी भुसे यांचे शुभहस्ते महा आवास अभियान पुरस्कार वितरण

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# ग्राम विकास विभाग

## संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष – ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय

## महा आवास


| | |
|---|---|
| मार्गदर्शक | राजेश कुमार, भा.प्र.से.<br>अतिरिक्त मुख्य सचिव,<br>ग्राम विकास व पंचायत राज विभाग |
| मुख्य संपादक | डॉ. राजाराम दिघे,<br>संचालक,<br>राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण |
| प्रबंध संपादक | मंजिरी टकले, उपसंचालक<br>नीलेश काळे, उपसंचालक<br>संजय घोगळे, प्र. सहा. संचालक (लेखा) |
| कार्यकारी संपादक | दिनेश मोवळे, प्रशिक्षण समन्वयक |
| सहाय्यक संपादक | डॉ. संघरत्न सोनवणे<br>राम आघाव<br>परमेश्वर शेलार<br>माधुरी चौधरी |
| मुख्यपृष्ठ मांडणी व सजावट | दिनेश मोवळे<br>प्रशिक्षण समन्वयक<br>(माहिती, शिक्षण व संवाद) |
| संपादकीय पत्ता | संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-<br>ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय<br>४ था मजला, दक्षिण कक्ष, सिडको भवन,<br>सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई - ४००६१४ |
| संकेत स्थळ | www.pmayg.nic.in<br>www.mahaawaas.com |
| ईमेल | directoriayruralhousing@gmail.com |
| दूरध्वनी क्रमांक | ०२२ - २७५६१८२४ |

वर्ष २ रे । अंक ८ वा । जुलै ते सप्टेंबर २०२२


## अनुक्रमणिका


| अ.क्र. | तपशिल | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | संपादकीय | १ |
| २ | स्वातंत्र्याचा अमृत महोत्स अंतर्गत घरोघरी तिरंगा | ३ |
| ३ | महा आवास अभियान पुरस्कार २०२१-२२ | ३ |
| ४ | विविध उपक्रमांचा मागोवा<br>क्षमता बांधणी उपक्रम | ६ |
| | संनियंत्रण व मूल्यमापन उपक्रम | १० |
| | माहिती, शिक्षण व संवाद उपक्रम | १६ |
| | समन्वय उपक्रम | १८ |
| | केंद्र व राज्य सरकार यांना ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रासंबंधित पॉलिसी इनपुट | २२ |
| ४ | ग्रामीण गृहनिर्माण योजनांचा संचित प्रगती अहवाल<br>प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण | २३ |
| | रमाई आवास योजना | २४ |
| | शबरी आवास योजना | २५ |
| | पारधी आवास योजना | २६ |
| | आदिम आवास योजना | २७ |
| | यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना | २७ |
| ५ | ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रातील नाविन्यपूर्ण उपक्रम/ यशोगाथा | २८ |
| ६ | फोटो गॅलरी | ३४ |
| ७ | मिडिया कवरेज | ३५ |


महा आवास हेल्पलाईन क्रमांक - १८०० २२ ०१९



डॉ. राजाराम दिघे
संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृहनिर्माण

डॉ. राजाराम दिघे
संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष -
ग्रामीण गृहनिर्माण

# स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत घरोघरी तिरंगा

भारतीय स्वातंत्र्याला ७५ वर्ष पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर जनतेच्या मनात या स्वातंत्र्य लढ्याच्या स्मृती तेवत राहाव्यात, स्वातंत्र्य संग्रामातील अज्ञात, नायक, क्रांतीकारक, स्वातंत्र्य संग्रामात घडलेल्या विविध घटना यांचे स्मरण व्हावे, देशभक्तीची जावल्य भावना कायम स्वरूपी जनमाणसात राहवा, या उद्देशाने स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव राज्यभरात राबविण्यात येत आहे. याचाच एक भाग म्हणून १३ ते १५ ऑगस्ट, २०२२ या कालावधीत **'घरोघरी तिरंगा'** हा उपक्रम राज्यात उत्साहात राबविण्यात आला आहे. यासाठी राज्याचे मा. मुख्यमंत्री, श्री. एकनाथ शिंदे व मा. उप मुख्यमंत्री, श्री. देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील संपूर्ण जनतेला दिनांक १३ ते १५ ऑगस्ट, २०२२ या कालावधीत घरोघरी तिरंगा लावण्याचे आवाहन केले. सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या लाभार्थ्यांनी आपल्या घरावर तिरंगा उभारून या उपक्रमात सक्रीय सहभाग नोंदविला

वरील उपक्रम राबविताना भारतीय ध्वज संहितेचे पालन होणे आवश्यक असून जाणते-आाणतेपणी राष्ट्रध्वजाचा अवमान होऊ नये, याची सर्वांनी काळजी घेण्याचे मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग यांनी सांगितले.





# महा आवास अभियान पुरस्कार २०२१ - २२

**'सर्वांसाठी घरे - २०२४'** या शासनाच्या धोरणांतर्गत केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, पारधी आवास योजना, आदिम आवास योजना, अटल बांधकाम कामगार आवास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना या सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या कामास गतिमान करणे व गुणवत्ता आणणे यासाठी गत वर्षी सन २०२०-२१ या वर्षामध्ये महाराष्ट्र राज्यात दिनांक २० नोव्हेंबर २०२० ते ०५ जून २०२१ या कालावधीत **"महा आवास अभियान-ग्रामीण"** राबविण्यात आले आहे. गत वर्षी राष्ट्रीय आवास दिनाचे औचित्य साधून राज्यात सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजना अधिक गतिमान करण्यासाठी व गुणवत्तावाढीसाठी दिनांक २० नोव्हेंबर, २०२० ते ०५ जून २०२१ या कालावधीत राबविण्यात आलेल्या **'महा आवास अभियान-ग्रामीण'** मुळे विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या अंमलबजावणीमध्ये आलेली गतीमानता व गुणवत्तावाढ विचारात घेता सन २०२१-२२ या वर्षामध्ये राज्यात दिनांक २० नोव्हेंबर २०२१ ते ३० जून २०२२ या कालावधीत **'महा आवास अभियान-ग्रामीण २.०'** हे अभियान राबविण्यात आले.

**'महा आवास अभियान-ग्रामीण २.०'** अंतर्गत अभियान कालावधीत राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांचे मूल्यमापन करुन उत्कृष्ट काम करणाऱ्या संस्था व व्यक्ती यांना पुरस्कार देवून गौरविण्याचे शासनाचे विचाराधीन होते. त्यानुषंगाने या कार्यालयाचे पत्र क्र. जा.क्र.महा आवास अभियान २.०/२०२२/९९७, दि. ३० जून २०२२ रोजीच्या पत्रान्वये अभियान कालावधीत उत्कृष्ट काम करणाऱ्या संस्था व व्यक्तींना **'महा आवास अभियान पुरस्कार'** देऊन गौरव करण्याचे सूचित करण्यात आले आहे.

दिनांक २० नोव्हेंबर २०२१ ते ३० जून २०२२ या अभियान कालावधी अभियानात राबविण्यात आलेल्या उपक्रमांच्या मूल्यमापनाच्या आधारे राज्य, विभाग, जिल्हा, तालुका, ग्रामस्तरावर केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत ग्रामीण गृहनिर्माण योजनांमध्ये उत्कृष्ट काम करणाऱ्या संस्था व व्यक्तींना **'महा आवास अभियान पुरस्कार'** देऊन गौरविण्यात आले. केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत ग्रामीण आवास योजनांमध्ये उत्कृष्ट काम करणाऱ्या संस्था व

व्यक्तींना दिनांक १६ नोव्हेंबर, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आलेल्या १० उपक्रमांमध्ये अभियान कालावधीत केलेल्या कामाच्या टक्केवारीच्या आधारे एकत्रित गुणांकन करून पुढीलप्रमाणे समित्यांव्दारे पुरस्काराची नामांकने अंतिम करण्यात आली.

| पुरस्कार नामांकने | उत्कृष्ट कामासाठीच्या पुरस्कारांची नामांकने निवडण्यासाठी समित्या |
|---|---|
| राज्यस्तरीय पुरस्कारांची निवड | राज्यस्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समिती |
| विभागस्तरीय पुरस्कारांची निवड | विभागस्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समिती |
| जिल्हास्तरीय पुरस्कारांची निवड | जिल्हास्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समिती |
| तालुकास्तरीय पुरस्कारांची निवड | तालुकास्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समिती |
| ग्रामपंचायतस्तरीय पुरस्कारांची निवड | तालुकास्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समिती |

**"महा आवास अभियान-ग्रामीण"** मध्ये उत्कृष्ट काम करणाऱ्या संस्था व व्यक्तींना **'महा आवास अभियान पुरस्कार'** म्हणून प्रदान करण्यात येणारे प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह याचे डिझाईन राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाने केले असून सन्मानचिन्हाची निर्मिती व प्रशस्तीपत्राची छपाई त्या त्या स्तरावरुन करण्यात आली.

राज्यस्तरावर **"महा आवास अभियान-ग्रामीण २.०"** मध्ये विविध ग्रामीण आवास योजनांमध्ये उत्कृष्ट काम करणाऱ्या संस्था व व्यक्तींना **'महा आवास अभियान पुरस्कार'** म्हणून सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे. तसेच अभियानातील विशिष्ट १० उपक्रमांना केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत आवास योजना ग्रामीण या योजनांमध्ये उत्कृष्ट काम करणाऱ्या संस्थाना राज्यस्तरावरुन **'महा आवास अभियान विशेष पुरस्कार'** म्हणून सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे. राज्यस्तरीय पुरस्कार वितरण कार्यक्रम मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या शुभहस्ते आयोजित करण्यात येईल.

## 'महा आवास अभियान पुरस्कार' ग्रामपंचायतस्तरीय पुरस्कार वितरण

तालुकास्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समितीने ग्रामपंचायतस्तरीय पुरस्कार निवडीसाठी दिनांक ०१ ते ०७ जुलै, २०२२ या कालावधीत मूल्यमापन करून पुरस्काराची नामांकने दिनांक ११ जुलै, २०२२ रोजी पर्यंत अंतिम केली.

ग्रामपंचायतस्तरीय पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम ग्रामपंचायत स्तरावर दिनांक १५ जुलै, २०२२ पर्यंत संबंधित ग्रामपंचायतीचे मा. सरपंच यांचे शुभहस्ते करण्यात आला. याप्रसंगी ग्रामपंचायतस्तरीय पुरस्कार विजेत्यांना प्रशस्तीपत्र देवून गौरविण्यात आले.

ग्राम पंचायत स्तरावर पुढील प्रमाणे **'महा आवास अभियान पुरस्कार'** वितरीत करण्यात आले.

**प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण**

**सर्वोत्कृष्ट घरकुल** - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक

**राज्य पुरस्कृत आवास योजना**

**सर्वोत्कृष्ट घरकुल** - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक




## 'महा आवास अभियान पुरस्कार' तालुकास्तरीय पुरस्कार वितरण

तालुकास्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समितीने तालुकास्तरीय पुरस्कार निवडीसाठी दिनांक १२ जुलै, २०२२ ते २१ जुलै, २०२२ या कालावधीत मूल्यमापन करून पुरस्काराची नामांकने दिनांक २२ जुलै, २०२२ रोजी अंतिम केली.

तालुकास्तरीय पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम तालुकास्तरावर ३१ जुलै २०२२ या महिन्यात संबंधित तालुक्याचे मा. आमदार यांच्या शुभहस्ते करण्यात आला. याप्रसंगी तालुकास्तरीय पुरस्कार विजेत्यांना प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देवून गौरविण्यात आले.

तालुकास्तरावर पुढील प्रमाणे **'महा आवास अभियान पुरस्कार'** वितरीत करण्यात आले.

**प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण**

१.सर्वोत्कृष्ट क्लस्टर - प्रथम क्रमांक



२.सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक

३.सर्वोत्कृष्ट घरकुल - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक

**राज्य पुरस्कृत आवास योजना**

१.सर्वोत्कृष्ट क्लस्टर - प्रथम क्रमांक

२.सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक

३.सर्वोत्कृष्ट घरकुल - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक

## 'महा आवास अभियान पुरस्कार' जिल्हास्तरीय पुरस्कार वितरण

जिल्हास्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समितीने जिल्हास्तरीय पुरस्कार निवडीसाठी दिनांक २३ जुलै ते ०१ ऑगस्ट, २०२२ या कालावधीत मूल्यमापन करून पुरस्काराची नामांकने दिनांक ०२ ऑगस्ट, २०२२ रोजी अंतिम केली.

जिल्हास्तरीय पुरस्कार वितरणाच्या कार्यक्रमांचे आयोजन स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून दिनांक १५ ऑगस्ट, २०२२ रोजी संबंधित जिल्ह्याचे मा.पालकमंत्री, मा. खासदार, मा. जिल्हा परिषद अध्यक्ष, जिल्हाधिकारी, पदाधिकारी व अधिकारी यांचे शुभहस्ते जिल्हास्तरावर करण्यात आले

याप्रसंगी जिल्हास्तरीय पुरस्कार विजेत्यांना प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देवून गौरविण्यात आले. जिल्हास्तरावर पुढील प्रमाणे 'महा आवास अभियान पुरस्कार' वितरीत करण्यात आले.

**प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण**

१.सर्वोत्कृष्ट तालुके - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक

२.सर्वोत्कृष्ट क्लस्टर - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक

३.सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक

**राज्य पुरस्कृत आवास योजना**

१.सर्वोत्कृष्ट तालुके - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक

२.सर्वोत्कृष्ट क्लस्टर - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक

३.सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक



## 'महा आवास अभियान पुरस्कार' विभागस्तरीय पुरस्कार वितरण

विभागस्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समितीने विभागस्तरीय पुरस्कार निवडीसाठी दिनांक ०३ ऑगस्ट ते १२ ऑगस्ट, २०२२ या कालावधीत मूल्यमापन करून पुरस्काराची नामांकने दिनांक २३ ऑगस्ट, २०२२ रोजी अंतिम केली.

विभागस्तरीय पुरस्कार वितरण कार्यक्रम विभागस्तरावर दिनांक १६ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट, २०२२ या कालावधित संबंधित विभागाचे विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय यांचे शुभहस्ते करण्याचे सूचित केले आहे. त्यानुषंगाने विभागस्तरावर कार्यवाही प्रगतीत असून विभागस्तरीय पुरस्कार विजेत्यांना प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देवून गौरविण्यात येणार आहे.

विभागस्तरावर पुढील प्रमाणे 'महा आवास अभियान पुरस्कार' वितरीत करण्यात आले.

**प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण**

१.सर्वोत्कृष्ट जिल्हे - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक

२.सर्वोत्कृष्ट तालुके - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक

३.सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक

४.शासकीय जागा उपलब्धता व वाळू उपलब्धता सर्वोत्कृष्ट कामगिरी करणारे तालुके - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक

**राज्य पुरस्कृत आवास योजना**

१.सर्वोत्कृष्ट जिल्हे - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक

२.सर्वोत्कृष्ट तालुके - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक

३.सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक

४.शासकीय जागा उपलब्धता व वाळू उपलब्धता सर्वोत्कृष्ट कामगिरी करणारे तालुके - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक

## गरिब, गरजू, बेघर व भूमिहीनांचे पक्क्या घराचे स्वप्नपूर्तीसाठी सर्वोतोपरी प्रयत्न करू

### - मा. मंत्री, ग्राम विकास, श्री. गिरीश महाजन

राज्यात ग्राम विकास विभागा मार्फत केंद्र व राज्यपुरस्कृत विविध योजना राबविण्यात येतात. या योजनांची प्रभावी अंमलबजावणी व्हावी, तसेच या योजनांमध्ये सध्या स्थितीत राज्यात सुरू असलेल्या कामांची प्रगती व योजनांविषयी माहिती घेण्यासाठी राज्याचे मा. मंत्री, ग्राम विकास, श्री. गिरीश महाजन यांच्या अध्यक्षतेखाली व मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, श्री. राजेश कुमार यांच्या प्रमुख उपस्थितीत दिनांक २९ ऑगस्ट, २०२२ रोजी ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई येथे ग्राम विकास विभागा अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांच्या अधिकाऱ्यांची बैठक संपन्न झाली.

या बैठकीच्या सुरूवातील मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, श्री. राजेश कुमार यांनी राज्यात ग्राम विकास विभागा मार्फत राबविण्यात येणाऱ्या सर्व योजनांबाबत सादरीकरण केले. तसेच सध्यास्थितीत या सर्व योजनांची आर्थिक व भौतिक स्थितीची सविस्तर माहिती मा. मंत्री महोदयांनी दिली.

या बैठकीला राज्यात राबविण्यात येणाऱ्या केंद्र व राज्य पुरस्कृत विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांची माहिती व ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रात गतिमानता व गणवत्ता आणण्यासाठी राबविण्यात आलेले नावीन्यपूर्ण उपक्रम या विषयीची सविस्तर माहिती संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे यांनी मा. मंत्री महोदयांनी सांगितली.

मा. मंत्री, ग्राम विकास, श्री. गिरीश महाजन यांनी सर्व योजनांची माहिती घेत विविध विषयांवर चर्चा केली. घरकुल योजना केंद्र व राज्याचा ध्वजांकीत कार्यक्रम असून गरिब, गरजू व भूमिहीनांचे पक्क्या घराचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी आपण सर्वोतोपरी प्रयत्न करू, असे मा. मंत्री महोदयांनी सांगितले.



## केंद्र सरकारची संसदीय समीक्षा समिती (PRC) सन २०२२-२३ ची प्रथम बैठक

ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांचेमार्फत **संसदीय समीक्षा समिती** (PRC) ची बैठक वर्षातून २ वेळ आयोजित करण्यात येते. या बैठकीमध्ये देशातील विविध राज्यांमध्ये ग्रामविकास विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या प्रधानमंत्री ग्राम सडक योजना, राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान, प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व इतर योजनांचा आढावा घेण्यात येतो. यामध्ये PMGSY, NRLM, DDU-GKY, PMAY-G, MGNREGA, SPMRM, SAGY, NSAP आणि DISHA इत्यादी योनांचा समावेश आहे. यावर्षी **संसदीय समीक्षा समिती (PRC)** ची बैठक दिनांक २९ व ३० सप्टेंबर, २०२२ रोजी ए.पी. शिंदे हॉल, NASC कॉम्प्लेक्स, पुसा, नवी दिल्ली येथे आयोजित करण्यात आली.

या बैठकीला महाराष्ट्र राज्यातून मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग श्री. राजेश कुमार, संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण डॉ. राजाराम दिघे व इतर योजनांचे अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीमध्ये देशात ग्राम विकास विभागाच्या योजनांमध्ये राबविण्यात येणारे नावीन्यपूर्ण उपक्रम, योजनांची अंमलबजावणी करतांना येणाऱ्या अडचणी व योजनांच्या यशस्वीतेसाठीचे नियोजन, इ. बाबत चर्चा सत्राचे आयोजन केले.

संसदीय समीक्षा समिती (PRC) बैठकीचा मुख्य उद्देश विविध राज्यातील नावीन्यपूर्ण उपक्रमांची माहिती घेवून योजनांची उद्दिष्टे कालबद्ध पद्धतीने साध्य करण्यासाठी आराखडे तयार करणे हा आहे. त्यानुषंगाने महाराष्ट्र राज्यात ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रात राबविण्यात आलेल्या विविध नावीन्यपूर्ण उपक्रमांबाबत डॉ. राजाराम दिघे यांनी या सादरीकरण केले.



## केंद्रीय राज्यमंत्र्यांकडून विविध योजनां विषयी लाभार्थ्यांची क्षमता बांधणी व सन्मान

मा. राज्यमंत्री, अन्न प्रक्रिया व जलशक्ती, भारत सरकार श्री. प्रल्हाद सिंग पटेल यांनी दिनांक २४ ऑगस्ट, २०२२ रोजी रायगड जिल्ह्याचा दौरा केला. यावेळी त्यांनी सर्व केंद्रीय योजनांचा आढावा घेतला. तसेच लाभार्थ्यांना विविध योजनां संदर्भात मार्गदर्शन केले. यामध्ये ग्रामीण केंद्र व राज्य पुरस्कृत विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या लाभार्थ्यांचाही समावेश होता.

विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनेंतर्गत घरकुल बांधकाम पूर्ण करणारे लाभार्थी यांचे कौतुक करत पंचायत समिती अलिबाग व मुरुड मधील प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण, शबरी आवास योजना, आदिम आवास योजना व रमाई आवास योजनांच्या लाभार्थ्यांना सन्मानीत केले.

याप्रसंगी पनवेलचे मा. आमदार श्री. प्रशांत ठाकूर, पेणचे मा. आमदार श्री. रवीशेठ पाटील, रायगडचे जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर, रत्नागिरीचे जिल्हाधिकारी श्री. बी. एन. पाटील, जिल्हा परिषद रायगडचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील, जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. अशोक दुधे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, रत्नागिरी प्रकल्प संचालक श्रीमती नंदिणी भालचंद्र घाणेकर, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रण, रायगड प्रकल्प संचालक श्री. निलेश घुले व इतर अधिकारी उपस्थित होते.



## आवास सॉफ्ट प्रणाली तांत्रिक मार्गदर्शनासाठी राज्यस्तरीय कार्यशाळा

राज्यव्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाने आवास सॉफ्ट प्रणालीवर तांत्रिक मार्गदर्शन देण्यासाठी एक दिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन दि. १६ सप्टेंबर, २०१२ रोजी सकाळी १०.०० ते सायंकाळी ६.०० या वेळेत जिल्हा परिषद कार्यालय, पुणे येथील सभागृहात केले होते.


या कार्यशाळेमध्ये आवास सॉफ्ट प्रणालीवर तांत्रिक मार्गदर्शन करण्यासाठी NIC, दिल्ली येथील Scientist श्री. आय. मोर स्वतः उपस्थित होते. यासोबतच राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माणचे संचालक डॉ. राजाराम दिघे, उपसंचालक नीलेश काळे व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, पुण्याच्या प्रकल्प संचालक श्रीमती शालिनी कडू, इ. मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

या कार्यशाळेला राज्य व्यवस्थापन कक्षातील अधिकारी व कर्मचारी यांच्या समवेत विभागीय प्रोग्रामर, जिल्हा प्रोग्रामर व व प्रत्येक जिल्ह्यातील प्रातिनिधीक स्वरुपातील एक तालुका डेटा एन्ट्री ऑपरेटर, इ. उपस्थित होते.

केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व इतर राज्य पुरस्कृत ग्रामीण गृहनिर्माण योजनांची अंमलबजावणी केंद्र शासनाच्या आवास प्रणालीव्दारे करण्यात येते. या प्रणालीच्या क्षेत्रिय स्तरावर येणाऱ्या अडचणीबाबत श्री. आय. मोर यांनी मार्गदर्शन केले. तसेच या कार्यशाळेमध्ये जिल्हा व तालुका स्तरावर आवास सॉफ्ट प्रणालीवर काम करतांना येणाऱ्या अडचणी सोडविण्यासही श्री. मोरे यांनी मार्गदर्शन केले. त्याचप्रमाणे आवास सॉफ्ट प्रणालीवर नव्याने तयार करण्यात आलेल्या डॅश बोर्ड बाबत सविस्तर माहिती दिली.

या कार्यशाळेत सर्व अधिकारी व कर्मचारी यांना आवास सॉफ्ट प्रणाली बाबत उपयुक्त माहिती मिळाली असे संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे यांनी सांगितले.





## तांत्रिक मार्गदर्शनासाठी राज्य व्यवस्थापन कक्षातील अधिकाऱ्यांच्या जिल्ह्यांना भेटी

राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयामार्फत राज्यात केंद्र व राज्य पुरस्कृत विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांची अंमलबजावणी करण्यात येते. या सर्व योजनांची अंमलबजावणी आवास सॉफ्ट प्रणालीव्दारे करण्यात येत असून यामध्ये क्षेत्रिय पातळीवर काम करतांना येणाऱ्या अडणींवर मार्गदर्शन करण्यासाठी राज्यव्यवस्थापन कक्षाचे उपसंचालक श्री.नीलेश काळे व राज्य समन्वयक (आय.टी.) श्री.राम आघाव यांनी नांदेड, नंदुरबार, जळगाव व नाशिक जिल्ह्यांचा दौरा केला.

या दौऱ्या दरम्यान श्री. राम आघाव यांनी दिनांक ६ जुलै, २०२२ रोजी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा नांदेड येथे भेट दिली. त्याच प्रमाणे श्री. नीलेश काळे व श्री. राम आघाव यांनी दिनांक ६ सप्टेंबर, २०२२ रोजी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा नंदुरबार, दिनांक ७ सप्टेंबर, २०२२ रोजी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा जळगाव व दिनांक ८ सप्टेंबर, २०२२ रोजी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा नाशिक येथे भेट दिली. या दरम्यान त्यांनी तांत्रिक अडचणी बाबतसबंधित अधिकारी व कर्मचारी यांना मार्गदर्शन केले. तसेच ग्रामीण गृहनिर्माण योजनांचा आढावा घेण्यात आला.

यावेळी संबंधित जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा कार्यालयाचे प्रकल्प संचालक, पंचायत समितीचे गट विकास अधिकारी, लेखाधिकारी, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, जिल्हा प्रोग्रामर, जिल्हा व तालुक्यातील ऑपरेटर उपस्थित होते.





## यशवंत घरकुल योजना व दिव्यांग घरकुल योजनेच्या लाभार्थ्यांसाठी पुणे येथे कार्यशाळा

दिनांक ८ जुलै २०२२ रोजी जिल्हा परिषद पुणे यांच्या समाज कल्याण विभागामार्फत नव्याने राबविण्यात येणाऱ्या यशवंत घरकुल योजना आणि दिव्यांग घरकुल योजनेच्या मंजूर झालेल्या लाभार्थ्यांसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. आयुष प्रसाद यांच्या अध्यक्षतेखाली ऑनलाईन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

यावेळी श्री. आयुष प्रसाद म्हणाले, यशवंत घरकुल योजना आणि दिव्यांग घरकुल योजनेंतर्गत मंजूर १ हजार १६ लाभार्थ्यांना जिल्हा परिषदेच्या फंडातून निधी उपलब्ध करण्यात येणार असून डिसेंबर २०२२ पर्यंत या सर्व घरकुलांचे काम पूर्ण करण्याचे उद्दिष्ट असल्याचेही ते म्हणाले.

यावेळी राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाचे वास्तुविशारद श्री. परमेश्वर शेलार यांनी घरकुल बांधणी विषयी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाला जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक श्रीमती शालिनी कडू, सहाय्य प्रकल्प अधिकारी श्री. प्रताप पाटील, विस्तार अधिकारी श्रीमती मानसी देशपांडे, श्री. नितीन पतंगे, तालुक्याचे गट विकास अधिकारी, संबंधित विभागाचे क्षेत्रीय अधिकारी, कर्मचारी व लाभार्थी उपस्थित होते.



## नांदेडच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केले घरकुल योजनाबाबत मार्गदर्शन

दिनांक २६ सप्टेंबर, २०२२ रोजी नांदेड जिल्ह्यातील पंचायत समिती हिमायतनगर येथे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती वर्षा ठाकुर-घुगे यांनी ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या लाभार्थ्यांना घरकुल बांधकाम व घरकुल योजनांबाबत मार्गदर्शन केले. तसेच प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व रमाई आवास योजने अंतर्गत घरकुले पूर्ण करणाऱ्या लाभार्थ्यांचा सत्कार केला.



## विभागीय आयुक्त कार्यालयाच्या अधिकाऱ्यांकडून डेमो हाऊसची पहाणी व मार्गदर्शन

राज्यात विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी विभागस्तरावरून नियमित आढावा बैठका व क्षेत्रिय भेटी करण्यात येतात.

दिनांक २१ जुलै, २०२२ रोजी पुणे विभागीय आयुक्त कार्यालयाचे उपायुक्त (आस्थापना) श्री. राहुल साकोरे यांनी पंचायत समिती कवठे महाकाळ येथे डेमो हाऊसची पहाणी केली. त्याचप्रमाणे दिनांक ३० सप्टेंबर, २०२२ रोजी उपायुक्त (विकास) श्री. विजय मुळीक यांनी मावळ तालुक्यातील जांभूळ गावातील घरकुलांची पहाणी केली. तसेच दिनांक २३ सप्टेंबर, २०२२ रोजी औरंगाबाद विभागीय आयुक्त कार्यालयाच्या सहाय्यक आयुक्त (विकास) श्रीमती सुपेकर यांनी बीड जिल्ह्यातील माजलगाव पंचायतसमिती येथे डेमो हाऊसची पाहणी केली.






## गरजूला घरकुल दिले तर आपल्या कुटुंबाला त्यांचा आशिर्वाद मिळेल - श्री. स्वामी

दिनांक ३० जुलै, २०२२ रोजी पंचायत समिती सांगोला येथे सोलापूर जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री. स्वामी यांनी घरकूल योजना बाबत सखोल मार्गदर्शन केले.

यामध्ये घरकुलांना मंजूरी, भूमिहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्धता, अंतिम टप्प्यातील घरकुले पूर्ण करणे, तसेच गरजू लाभार्थींच्या अडी अडचणीवर मार्ग काढून घरे पूर्ण करणे या बद्दल श्री.स्वामी उपस्थित सर्व अधिकारी, ग्रामसेवक व ग्रामस्थ यांना यांनी अतिशय मार्मिकपणे मार्गदर्शन केले. 'एखाद्या गरजू लाभार्थीला घरकूल मिळाले तर त्याचा आशीर्वाद आपल्या कुटुंबाला मिळेल' अशा शब्दात सांगत श्री. स्वामी यांनी सर्व अधिकारी व कर्मचारी यांना घरकुल योजनांमध्ये सक्रीय सहभाग नोंदविण्याचे आवाहन केले.



## वर्धा जिल्ह्यात ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या लाभार्थ्यांसाठी मेळाव्यांचे आयोजन

वर्धा जिल्ह्यामध्ये दिनांक २ सप्टेंबर, २०२२ रोजी पंचायत समिती समुद्रपूरचे गट विकास अधिकारी श्री. दुबे यांनी तालुक्यातील ग्रामपंचायत गिरड येथे प्रपत्र -ब मधील ८३ भूमिहीन लाभार्थ्यांचा मेळावा घेण्यात आला. यामध्ये घरकुल लाभार्थ्यांना जागा उपलब्धतेबाबत मार्गदर्शन व जागा घेण्यास उत्सुक नसलेल्या लाभार्थ्यांकडून लेखी घेवून त्यांचे घरकुल रद्द करण्याची कार्यवाही करण्यात आली.

दिनांक १३ सप्टेंबर, २०२२ रोजी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत मंजूर लाभार्थी यांचे प्रथम हप्ता वितरीत करून घरकुल बांधकाम सुरू न केलेले व प्रपत्र ब मधील जागा उपलब्ध नसलेले लाभार्थी यांचा मेळावा आर्वी तालुक्यातील ग्रामपंचायत मोरागंणा, काचनूर, कासारखेडा, वाधोना येथे गट विकास अधिकारी श्री. अनिल गावंडे यांनी घेतला. तसेच पंचायत समिती आर्वी येथे दिनांक १६ सप्टेंबर, २०२२ रोजी ग्रामसेवक यांची आढावा सभा घेवून प्रपत्र ब व ड मधील अपात्र लाभार्थी रिमांड करणे , अपूर्ण घरकुले पूर्ण करणे व घरकुल योजनांचा सविस्तर आढावा श्री. अनिल गावंडे यांनी घेतला.



## मा. मंत्री, बंदरे आणि खनिकर्म, श्री. दादाजी भुसे यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या लाभार्थ्यांचे अतिक्रम नियमानुकूल संदर्भात आढावा बैठक

राज्यात राबविण्यात येणाऱ्या विविध ग्रामीण गृहनिर्माण योजना राबविण्यात येतात. परंतु घरकुलास पात्र परंतु घरकुल बांधकामास जागा नाही व शासकीय जागेवर अतिक्रमण करून राहणारे भूमिहीन लाभार्थी यांचे घरकुलाचे स्वप्न पूर्ण होण्यास अडचणी येतात. भूमिहीन लाभार्थ्यांसाठी पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुलजागा खरेदी अर्थसहाय्य योजना तर अतिक्रमण करून राहणाऱ्या लाभार्थ्यांसाठी शासकीय जागा अतिक्रमण नियमानुकूल करण्यासाठी योजना आहेत.

अतिक्रमण नियमानुकूल संदर्भात कामाबाबत दिनांक ०१ व ०२ ऑगस्ट, २०२२ रोजी राज्य व्यवस्थापन कक्षाचे श्री. मधुकर वाघ यांनी नाशिक जिल्ह्याचा दौरा केला. दिनांक ०१ ऑगस्ट, २०२२ रोजी श्री. मधुकर वाघ यांनी जिल्हा परिषद नाशिकचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री. रविंद्र परदेशी, सहाय्यक गट विकास अधिकारी श्री. वेंधे, CSC कंपनीचे प्रतिनिधी व जिल्हा व्यवस्थापक यांचेशी अतिक्रमण नियमानुकूल संदर्भात चर्चा केली.

या विषयी दिनांक २ ऑगस्ट, २०२२ रोजी मालेगाव येथे मा. मंत्री, बंदरे आणि खनिकर्म, श्री.दादाजी भुसे यांनी बैठक घेतली. या बैठकीमध्ये अतिक्रमण नियमानुकूल बाबत चर्चा व आजपावेतो या संदर्भात झालेल्या कामाची माहिती मा. मंत्री महोदयांनी घेतली. या बैठकीला श्री. मधुकर वाघ यांच्या समवेत CSC कंपनीचे प्रतिनिधी व पंचायत समिती मालेगावचे गट विकास अधिकारी उपस्थित होते.





## राज्यात ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या कामात सर्वांनी सक्रीय सहभाग घ्यावा
### - मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, श्री. राजेश कुमार

राज्यात राबविण्यात येणाऱ्या केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांची प्रभावी अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन करण्यासाठी दिनांक २६ सप्टेंबर, २०२२ रोजी मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, श्री.राजेश कुमार यांच्या अध्यक्षतेखाली व संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे यांच्या उपस्थितीत दूरदृष्य प्रणालीव्दारे आढावा बैठक आयोजित करण्यात आली.

या बैठकीला राज्यातील सर्व विभागीय आयुक्त कार्यालयाचे उप आयुक्त (विकास), जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक व राज्य व्यवस्थापन कक्षाचे अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीमध्ये डॉ. राजाराम दिघे यांनी केंद्र व राज्य पुरस्कृत विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत भौतिक व आर्थिक प्रगतीबाबत सादरीकरण केले. त्यानुसार मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, श्री.राजेश कुमार यांनी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत योजनेमधील घरकुलांना मंजूरी देणे, अपूर्ण घरकुले पूर्ण करणे, लाभार्थ्यांना सर्व योजनांचे हप्ते वितरीत करणे, राज्य योजनेतील घरकुलांचे आधार सिडींग पूर्ण करणे, तालुका व जिल्हा डेमो हाऊस पूर्ण करणे, महा आवास अभियान-ग्रामीण २.० पुरस्कार वितरण करणे व शासकीय जमीनीवरील निवासी अतिक्रमणे नियमित करणे अशा सूचना बैठकीला उपस्थित सर्वांना केल्या.




## आझादी का अमृत महोत्सव अंतर्गत अमृत घरकुल मोहिमेच्या यशस्वीतेसाठी संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांचे बैठका सत्र

आझादी का अमृत महोत्सव अंतर्गत विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांचे सूचना अन्वये महाराष्ट्र राज्याला दिनांक १० मे, २०२२ ते १५ ऑगस्ट, २०२२ पर्यंत २.४० लाख घरकुले पूर्ण करण्याचे उद्दिष्ट देण्यात आले. मात्र दिनांक १० मे ते २८ जून, २०२२ पर्यंत केवळ २६ हजार घरकुले पूर्ण झाली. उर्वरित २.१५ लाख घरकुले दिनांक १५ ऑगस्ट, २०२२ पर्यंत पूर्ण होणे आवश्यक असल्याने **दिनांक १ जुलै, २०२२ ते १५ ऑगस्ट, २०२२ या कालावधीत राज्यात 'अमृत घरकुल मोहिम' राबवून या कालावधीत प्रत्येक जिल्हयात दररोज किमान ७५ x २ = १५० घरकुले पूर्ण करण्याचे उद्दिष्ट देण्यात आले.**

अमृत घरकुल मोहिम अंतर्गत उद्दिष्ट पूर्तीसाठी व या मोहिमेच्या यशस्वीतेसाठी संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांनी विभागीय आयुक्त कार्यालयाचे उपायुक्त (विकास), जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक, जिल्हा परिषदेचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) व पंचायत समितीचे गट विकास अधिकारी यांच्या आढावा बैठकांचे सत्र सुरू केले.

या बैठकांमध्ये घरकुलांना मंजूरी, पहिला हप्ता वितरण, घरकुले बांधकाम तात्काळ पूर्ण करणे, लाभार्थ्याला बांधकाम साहित्याची योग्य दरात व वेळेत उपलब्धता, ग्राम सेवक/ग्रामविकास अधिकाऱ्यास दिलेली उद्दिष्टपूर्ती, संपर्क अधिकारी यांच्या तालुका व गाव पातळीवर भेटी, उद्दिष्टानुसार जिल्हयांत दररोज किती घरकुले पूर्ण होत आहेत याचा आढावा डॉ. राजाराम दिघे यांनी घेतला. तसेच अमृत घरकुल मोहिम यशस्वीतेसाठी सर्व अधिकारी व पदाधिकारी यांनी सक्रीय सहभाग नोंदवावा असे आवाहन केले.




प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण - मंजूरी

| Sr. No. | District | Target (PWL+ Awaas+) | Sanction | 01.07.2022 | 02.07.2022 | 03.07.2022 | 04.07.2022 | 05.07.2022 | 06.07.2022 | 07.07.2022 | 08.07.2022 | 09.07.2022 | 10.07.2022 | 11.07.2022 | 12.07.2022 | 13.07.2022 | AGM Achiv | Remaining |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | Total | 1450293 | 1250930 | -5 | 8 | 0 | 725 | 998 | 724 | 1141 | 632 | 210 | 16 | 1028 | 605 | 606 | 6688 | 199363 |
| 1 | YAVATMAL | 65679 | 51834 | 11 | 0 | 0 | 120 | 268 | 34 | 365 | 155 | 78 | 0 | 75 | 108 | 23 | 1237 | 13845 |
| 2 | AMRAVATI | 98675 | 79717 | 0 | 0 | 0 | 72 | 91 | 98 | 136 | 26 | 24 | 0 | 82 | 57 | 44 | 630 | 18958 |
| 3 | PARBHANI | 19249 | 13076 | 0 | 0 | 0 | 109 | 19 | 116 | 120 | 8 | 47 | 10 | 55 | 43 | 38 | 565 | 6173 |
| 4 | BEED | 35436 | 29419 | 0 | 0 | 0 | 91 | 80 | 157 | 0 | 0 | 0 | 0 | 96 | 0 | 0 | 424 | 6017 |
| 5 | BULDHANA | 46050 | 31546 | 0 | 0 | 0 | 22 | 6 | 36 | 24 | 37 | 0 | 0 | 168 | 65 | 4 | 362 | 14504 |
| 6 | NANDURBAR | 119548 | 111156 | 0 | 0 | 0 | -28 | 85 | -1 | 0 | 0 | 0 | 0 | 181 | 9 | 88 | 334 | 8392 |
| 7 | LATUR | 21233 | 17187 | 0 | 0 | 0 | 49 | 63 | 12 | 37 | 74 | 0 | 0 | 48 | 0 | 37 | 320 | 4046 |
| 8 | AHMEDNAGAR | 66056 | 54578 | -4 | 0 | 0 | 0 | 7 | 77 | 78 | 47 | 0 | 0 | 0 | 32 | 36 | 273 | 11478 |
| 9 | DHULE | 64539 | 61998 | 0 | 0 | 0 | 5 | 18 | 43 | 55 | 60 | 0 | 0 | 19 | 22 | 44 | 266 | 2541 |
| 10 | NANDED | 69941 | 60635 | 0 | 0 | 0 | 55 | 24 | 0 | 92 | 0 | 0 | 0 | 57 | 0 | 25 | 253 | 9306 |
| 11 | JALNA | 24714 | 18229 | 0 | 0 | 0 | 24 | 44 | 90 | 32 | 8 | 8 | 0 | 0 | 0 | 39 | 245 | 6485 |
| 12 | WASHIM | 20642 | 13707 | 0 | 0 | 0 | 29 | 43 | 3 | 1 | 46 | 0 | 0 | 70 | 0 | 0 | 192 | 6935 |
| 13 | CHANDRAPUR | 44142 | 37608 | 0 | 0 | 0 | 11 | 34 | 24 | 1 | 7 | 0 | 0 | 0 | 69 | 15 | 161 | 6534 |
| 14 | PALGHAR | 34874 | 33775 | 0 | 0 | 0 | 6 | 2 | 51 | 65 | 0 | 0 | 0 | 23 | 1 | 0 | 148 | 1099 |
| 15 | SATARA | 17694 | 14246 | 0 | 0 | 0 | 13 | 11 | 30 | 4 | 48 | 10 | 0 | 1 | 1 | 19 | 137 | 3448 |

## ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या प्रभावी अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापनासाठी राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाच्या अधिकाऱ्यांकडून क्षेत्रिय भेटी

राज्यात केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना व राज्य पुरस्कृत विविध ग्रामीण गृहनिर्माण योजना राबविण्यात येतात. या सर्व योजनांची प्रभावी अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापनासाठी राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाच्या अधिकाऱ्यांनी राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये क्षेत्रिय भेटी देवून ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या कामाची पहाणी व मार्गदर्शन केले.

यामध्ये राज्य प्रशिक्षण समन्वयक (वास्तुविशारद) श्री. परमेश्वर शेलार यांनी दिनांक १४ जुलै, २०२२ रोजी बीड जिल्ह्यातील आष्टी



तालुक्यातील घरकुल योजनांच्या कामांची पहाणी केली. दिनांक १५ जुलै, २०२२ रोजी जिल्हा परिषद उस्मानाबाद येथे एक दिवसीय कार्यशाळेत मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. राहुल गुप्ता यांच्या प्रमुख उपस्थितीत घरकुल बांधकाम तंत्रज्ञाना विषयी मार्गदर्शन केले. दिनांक २९ जुलै, २०२२ रोजी रायगड व रत्नागिरी जिल्ह्यातील घरकुल योजनांच्या कामांची पहाणी केली. तसेच दिनांक २९ व ३० सप्टेंबर रोजी सांगली जिल्ह्यातील शिराळा व वाळवा तालुक्यातील कामांची पहाणी केली.

राज्य समन्वयक (आय.टी.) श्री. राम आघाव व राज्य संनियंत्रण व मूल्यमापन समन्वयक श्री. संघरत्न सोनवणे यांनी दिनांक १५ जुलै, २०२२ रोजी पुणे येथे बँक ऑफ महाराष्ट्रचे महा प्रबंधक श्री. अतुल जोशी व विभागीय आयुक्त कार्यालयाचे उपायुक्त (विकास) श्री. विजय मुळीक यांची भेट घेतली.

दिनांक २९ ऑगस्ट २०२२ रोजी अमरावती जिल्ह्यातील पंचायत समिती अमरावती येथे गट विकास

अधिकारी श्री. राजेंद्र देशमुख व पंचायत समिती दर्यापूर येथे गट विकास अधिकारी श्री. बाळासाहेब रायबोले तसेच दिनांक ३० ऑगस्ट २०२२ रोजी अकोला जिल्ह्यातील पंचायत समिती अकोटचे गट विकास अधिकारी श्री. किशोर शिंदे या सर्व गट विकास अधिकाऱ्यांशी ग्रामीण गृहनिर्माण योजनांबाबत चर्चा केली. तसेच तालुकास्तरीय डेमो हाऊसची पहाणी करून डेमो हाऊसमध्ये कॉप-शॉप सूरू करणे व तालुक्यात ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रात राबवित असलेले नाविन्यपूर्ण उपक्रम व यशोगाथा पाठविणे बाबत गट विकास अधिकारी यांना सांगितले. तसेच अमरावती, दर्यापूर व अकोट तालुक्यातील ग्रामपंचायतींना भेटी देवून घरकुले व बहुमजली इमारतीची पहाणी व ग्रामस्थांना मार्गदर्शन केले.







## प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण च्या उद्दिष्टपूर्तीसाठी केंद्र सरकारच्या बैठका

मा.सचिव, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांनी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीणच्या प्रभावी अंमलबजावणी, संनियंत्रण, मूल्यमापन व उद्दिष्टपूर्तीसाठी माहे जुलै ते सप्टेंबर २०२२ या कालावधीत सर्व राज्यांच्या बैठका घेतल्या. या बैठकांना महाराष्ट्र राज्यातून संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे उपस्थित होते.

या बैठकांमध्ये राज्यास प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत देण्यात आलेल्या उद्दिष्टपूर्तीचा आढावा घेण्यात आला. तसेच उद्दिष्टपूर्तीसाठी राज्याने केलेल्या उपाययोजना व उद्दिष्टपूर्ती या विषयी चर्चा करण्यात आली. त्याचप्रमाणे उर्वरीत उद्दिष्टपूर्तीचे नियोजन राज्याकडून घेण्यात आले. आवास सॉफ्ट प्रणाली मधील बदलांबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

महाराष्ट्र राज्याचे उद्दिष्टपूर्तीसाठी गेल्या दोन वर्षापासून राज्यात महा आवास अभियान-ग्रामीण राबविण्यात येत असून यासोबतच यावर्षी आझादी का अमृत महोत्सव अंतर्गत दिनांक १ जुलै, २०२२ ते १५ ऑगस्ट, २०२२ या कालावधीत अमृत घरकुल मोहिम राबविण्यात आली. यामुळे राज्यात ग्रामीण गृहनिर्माण योजनांमध्ये अधिक गतिमानता व गुणवत्ता आली असल्याचे संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे यांनी सांगितले.

तसेच भुमिहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्धतेसाठी राज्यात टास्क फोर्स समितीची स्थापना करण्यात आली असून यामुळे जागे अभावी प्रलंबित घरकुले व भुमिहीन लाभार्थ्यांचे घराचे स्वप्न पूर्ण होणार असल्याचे डॉ. राजाराम दिघे यांनी सांगितले.



Physical Progress (Completion) (as on 20.09.2022)

| S. No. | State/UT | Target | Sanctioned | Completed |
|---|---|---|---|---|
| 1 | Madhya Pradesh | 37,89,400 | 37,42,051 | 28,82,448 |
| 2 | Assam | 20,84,070 | 13,32,961 | 6,70,827 |
| 3 | Bihar | 38,83,611 | 36,90,101 | 31,90,708 |
| 4 | Maharashtra | 15,05,983 | 12,77,879 | 9,18,084 |
| 5 | Tamil Nadu | 8,17,439 | 7,57,913 | 4,19,088 |
| 6 | Rajasthan | 17,33,959 | 17,26,806 | 15,08,721 |
| 7 | Jharkhand | 16,03,268 | 15,83,322 | 13,83,429 |
| 8 | Odisha | 26,95,837 | 18,38,032 | 17,08,383 |
| 9 | West Bengal | 34,82,359 | 34,68,511 | 33,76,515 |
| 10 | Jammu & Kashmir | 2,01,633 | 1,95,179 | 1,09,271 |
| 11 | Tripura | 2,82,238 | 2,37,097 | 1,81,120 |
| 12 | Gujarat | 4,49,167 | 4,33,114 | 3,92,098 |
| 13 | Uttar Pradesh | 26,15,951 | 26,10,540 | 25,92,504 |
| | Total | 2,51,44,915 | 2,28,93,506 | 1,93,33,196 |
| | All India Progress | 2,71,92,795 | 2,45,59,069 | 2,04,84,283 |

## सुशासन नियमावली (Manual of Good Governance) तयार करण्यासाठी बैठक

सुशासन नियमावली (Manual of Good Governance) तयार करण्यासाठी स्थापन केलेल्या समितीस विभागांची माहिती उपलब्ध करून देण्यासाठी मा.सेवानिवृत्त भा.प्र.से. तथा माजी राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई व सुप्रशासन नियमावलीचे सदस्य श्री. अजितकुमार जैन यांनी दिनांक १४ सप्टेंबर, २०२२ रोजी ग्राम विकास व पंचायत राज विभाग कार्यालय, बांधकाम भवन, मुंबई येथे बैठक संपन्न झाली.

राज्यामध्ये ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या अंमलबजावणीमध्ये सुशासन स्थापीत करण्यासाठी शासनाने नवनवीन संकल्पनांचा आधार घेऊन अधिक पारदर्शी व लोकाभीमुख प्रशासन निर्माण केले. यामध्ये लाभार्थी निवड, अनुदान वाटप, सनियंत्रण पद्धतीमध्ये अमुलाग्र बदल करून सार्वजनिक आर्थिक व्यवस्थापन प्रणाली (PFMS), आवास सॉफ्ट प्रणाली याच्या माध्यमातून अधिक पारदर्शीपणा यामध्ये आला आहे.

## भुमिहीन लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी अडचण येणार नाही याची दक्षता घ्यावी
### - श्री. अभिजित राऊत, जिल्हाधिकारी, जळगाव

राज्यात विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या भुमिहीन लाभार्थ्यांना घरकुल बांधकामाकरीता जागा उपलब्धतेसाठी जळगाव जिल्ह्याचे जिल्हाधिकारी, श्री.अभिजित राऊत यांच्या अध्यक्षतेखाली व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या उपस्थितीत दिनांक ०२ ऑगस्ट, २०२२ रोजी आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीला जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जळगाव प्रकल्प संचालक, सर्व पंचायत समितीचे गटविकास अधिकारी, मंडळ अधिकारी, तहसीलदार, विस्तार अधिकारी, सबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांअंतर्गत जळगाव जिल्ह्यातील भुमिहीन लाभार्थ्यांना लवकरात लवकर जागा उपलब्ध करून द्यावा. तसेच याकामी विनाकारण कोणत्याही अडचणी निर्माण होणार याची दक्षता घेण्याच्या सूचना श्री. अभिजित राऊत दिल्या.

तसेच दिनांक १५ ऑगस्ट, २०२२ पर्यंत सर्व घरकुलांना मंजूरी व पहिल्या हप्त्याचे वितरण करून जास्तीत जास्त घरकुले पूर्ण करण्याच्या सूचना डॉ.पंकज आशिया यांनी उपस्थित सर्व संबंधित अधिकारी व कर्मचारी यांना केल्या.



## आझादी का अमृत महोत्स अंतर्गत अमृत घरकुल मोहिम उद्दिष्टपूर्तीसाठी नंदुरबार जिल्ह्यात मुख्य कार्यकारी अधिकारी व प्रकल्प संचालक यांच्या आढावा बैठका

राज्यात दिनांक ०१ जुलै ते १५ ऑगस्ट, २०२२ या कालावधीत आझादी का अमृत महोत्सव अंतर्गत अमृत घरकुल मोहिम राबविण्यात आली. या मोहिमे अंतर्गत घरकुलांच्या उद्दिष्टपूर्तीसाठी दिनांक २६ जुलै, २०२२ रोजी नंदुरबार जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचासक श्री. राजेंद्र पाटील यांनी जिल्ह्यातील ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांची आढावा बैठक घेतली.

या बैठकीमध्ये लिंटेल लेव्हल, रुफ लेव्हल आणि अपूर्ण घरकुलांचा ग्रामपंचायतनिहाय आढावा घेत ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांना दिलेले घरकुलांचे उद्दिष्ट दिनांक १५ ऑगस्ट पर्यंत पूर्ण करण्याच्या सूचना श्री. राजेंद्र पाटील यांनी दिल्या.

त्याचप्रमाणे दिनांक २७ जुलै, २०२२ रोजी जिल्हा परिषद नंदुरबारचे मुख्य कार्यकारी अधिकारी .श्री. रघुनाथ गावडे यांनी अमृत घरकुल मोहिम अंतर्गत उद्दिष्पूर्तीचा आढावा घेतला. यावेळी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक श्री.राजेंद्र पाटील, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्ह्यातील सर्व पंचायत समितीचे गट विकास अधिकारी, सहाय्यक प्रकल्प अधिकारी श्री. विश्वजित पाटील, जिल्हा प्रोग्रामर श्री. भुपेंद्र पाटील, जिल्हा ऑपरेटर श्री. रविंद्र माळी, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, ग्रामसेवक यांच्यासह जिल्हा व तालुकास्तरावरील संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी जिल्ह्यातील आवास प्लस मधील १० पेक्षा जास्त रजिस्ट्रेशन प्रलंबित असलेल्या ग्रामपंचायत निहाय ग्रामसेवकांचा आढावा घेण्यात आला. अमृत घरकुल मोहिम अंतर्गत सर्व अपूर्ण घरकुले दिनांक १५ ऑगस्ट पर्यंत पूर्ण करणेबाबत सूचना श्री. रघुनाथ गावडे यांनीकेल्या. त्याचप्रमाणे महा आवास अभियान-ग्रामीण २.० पुरस्कार वितरणाबाबत तालुकानिहा आढावा व मार्गदर्शन केले. तसेच घरकुल उद्दिष्टपूर्ती व पुरस्कार वितरण हे विहीत मुदतीत करण्याच्या सूचना श्री. रघुनाथ गावडे यांनी केल्या.





## परभणीचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या संकल्पनेतून घरकुल मंजूरी कॅम्पचे आयोजन

राज्यात राबविण्यात येणाऱ्या विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या लाभार्थ्यांना घरकुल मंजूरीसाठी जिल्हा परिषद परभणीचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.शिवानंद टाकसाळे यांच्या संकल्पनेतून व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक श्रीमती रश्मी खांडेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हा परिषद परभणीच्या सभागृहा मध्ये दिनांक ०१ सप्टेंबर, २०२२ रोजी घरकुल मंजूरी कॅम्प आयोजित करण्यात आला.

यावेळी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेतील विस्तार अधिकारी श्री. नारायण शिंदे , शाखा अभियंता श्री. श्रीकृष्ण वसेकर, जिल्हा प्रोग्रामर श्री. नंदकिशोर गमे व जिल्हा डेटा एन्ट्री ऑपरेटर श्रीमती प्रणिता चव्हाण यांच्यासह इतर सबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

या घरकुल मंजूरी कॅम्प मध्ये आवास प्लस अंतर्गत सण २०२१-२२ मधील ग्रामपंचायतीच्या उद्दिष्ट प्रमाणे घरकुलांना अद्यापही मंजूरी न दिलेल्या ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक व पंचायत समिती स्तरावरील गटविकास अधिकारी, विस्तार अधिकारी व डेटा एन्ट्री ऑपरेटर यांना समक्ष बोलून घरकुल मंजूरीबाबत आढावा घेवून ज्या काही अडचणी असतीलत्या दूर करून घरकुलांना तात्काळ मंजूरी देण्यात आली. तसेच ज्या ग्रामपंचायतीचे कामे अपूर्ण आहेत अशा ग्रामपंचायतीच्या लाभार्थ्यांच्या रजिस्ट्रेशन करून घेण्यात आले.



## सोलापूर प्रकल्प संचालकांची घरकुल योजनांच्या गतिमानतेसाठी आढावा बैठक

जिल्हा ग्रामीण विकासयंत्रणा सोलापूरचे प्रकल्प संचालक श्री. संतोष धोत्रे यांनी दूरदृष्य प्रणालीव्दारे दिनांक २१ सप्टेंबर, २०२२ रोजी जिल्ह्यातील सर्व गटविकास अधिकारी, सहाय्यक लेखा अधिकारी व विस्तार अधिकारी यांची सर्व घरकुल योजनांची आढावा बैठक घेतली. या बैठकीला जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे सहाय्यक प्रकल्प संचालक श्री.उमेश कुलकर्णी, जिल्हा प्रोग्रामर सर्फराज शेख व जिल्हा डेटा एन्ट्री ऑपरेटर प्रमिला बचुटे यांच्यासह जिल्ह्यातील संबंधित अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीमध्ये केंद्र व राज्यपुरस्कृत सर्व घरकुल योजनांचा तालुकानिहाय आढावा घेण्यात आला. तसेच अपूर्ण घरकुले पूर्ण करणे, घरकुलांना तात्काळ मंजूरी देणे, प्रलंबित घरकुले पूर्ण करणे, आर्थिकदृष्ट्या अपूर्ण घरकुले पूर्ण करणे, भूमिहीन लाभार्थ्यांना घरकुलांसाठी जागा उपलब्द करून देणे, जे लाभार्थी घरकुल बांधकाम सुरू करण्यास इच्छुक नाहीत त्या लाभार्त्यांना वगळण्याची (remand) करण्याची प्रक्रिया तात्काळ पूर्ण करणे अशा सुचना श्री.संतोष धोत्रे यांनी बैठकीमध्ये दिल्या.



## पुणे जिल्ह्यात ग्रामीण गवंडी प्रशिक्षणांचे आयोजन

घरकुलांच्या कामांमध्ये गतिमानता व गुणवत्ता आणण्यासाठी व कुशल गवंड्यांची निर्मिती करण्यासाठी पुणे जिल्ह्यात दिनांक २२ व २३ ऑगस्ट, २०२२ रोजी शिरीर तालुक्यातील ग्रामपंचायत बाबुळसर खु., जळगाव सुपे व न्हावरे येथे प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत ग्रामीण गवंडी प्रशिक्षणाचे आयोजन आर.पी.एल. संस्था, पुणे यांच्या मार्फत घेण्यात आले. या प्रशिक्षणाला एकुण १५ प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.



## अमृत घरकुल मोहिम अंतर्गत १५ ऑगस्ट पर्यंत सर्व घरकुले पूर्ण करावी

### - श्रीमती प्रतिभा संगमनेरे, प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, धुळे

दिनांक २६ जुलै, २०२२ रोजी अमृत घरकुल मोहिम अंतर्गत घरकुलांचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी धुळे जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक श्रीमती प्रतिभा संगमनेरे यांनी जिल्ह्यातील ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांची आढावा बैठक घेतली.

या बैठकीमध्ये अमृत घरकुल मोहिम अंतर्गत अपूर्ण घरकुले १५ ऑगस्ट, २०२२ पर्यंत पूर्ण करणेच्या सूचना देण्यात आल्या. यावेळी शाखा अभियंता, श्री.स्वांनद पाटील, जिल्हा प्रोग्रामर श्री. हर्षल माळी, जिल्हाडेटा एन्ट्री ऑपरेटर श्री. अमोल माळी तसेच जिल्हा व तालुकास्तरावरील सर्व संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



## नांदेड जिल्हात पहिला हप्ता घेवून घरकुलाचे काम सुरू न केलेल्या लाभार्थ्यांसाठी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन

दिनांक १३ ऑगस्ट २०२२ रोजी नांदेड जिल्ह्यातील विविध तालुक्यामध्ये केंद्र व राज्य पुरस्कृत विविध आवास योजनांचा पहिला हत्ता घेवून १२ महिन्यांपेक्षा जास्त कालावधी उलटूनही घरकुल बांधकाम सूरू न केलेल्या लाभार्थ्यांसाठी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण नांदेड येथे तडजोडी करून कामे सुरु करण्याकरिता लोक अदालत आयोजित करण्यात आली होती. सदर लोक आदालतीस मा. जिल्हा न्यायाधीश श्री. बागर यांनी भेट दिली असून दिवाणी न्यायाधीश क. स्तर नांदेड यांच्या माध्यमातून प्रकरणे निकाली काढण्यात आले.

बिलोली, हदगांव, नायगांव, उमरी, मुदखेड, देगलूर, किनवट, हिमायतनगर, अर्धापूर, धर्माबाद, भोकर, व लोहा येथे केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत विविध आवास योजनांच्या लाभार्थ्यांसाठी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले होते. या लोक अदालतीमध्ये प्रलंबित घरकुलांच्या लाभार्थ्यांकडून घरकुल विलंबांच्या अडचणी बाबतच विचारणा करून तात्काळघरकुलांचे कामे सुरु करणेबाबत सुचना देण्यात आल्यात. तसेच जे लाभार्थी घरकुल बांधकाम करण्यास इच्छुक नाही त्यांनी पहिल्या हप्त्याची रक्कम परत करण्याच्या सूचना देण्यात आल्या. यासर्व बाबी लाभार्थ्यांकडून लेखी स्वरूपात घेण्यात आल्यात. यावेळी पंचायत समितीचे गट विकास अधिकारी, विस्तार अधिकारी, शाखा अभियंता, ग्रामीण गृहनिर्माण अभियंते, ग्रामसेवक, डेटा एन्ट्री ऑपरेटर व प्रलंबित घरकुलांचे लाभार्थी लोक न्यायालयात उपस्थीत होते.



## हदगावचे गट विकास अधिकारी यांनी घेतला ग्रामीण गृहनिर्माण योजनांचा आढावा

दिनांक १२ सप्टेंबर, २०२२ रोजी नांदेड जिल्ह्यातील पंचायत समिती हदगाव येथे गट विकास अधिकारी श्री.उमेश मुदखेड यांनी ग्रामसेवक व ग्रामविकास अधिकारी यांती आढावा बैठक घेतली.

या बैठकीमध्ये प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व इतर राज्य पुरस्कृत आवास योजनांतर्गत इतर संवर्गातील लाभार्थीच्या याद्या व संख्या कळविण्या बाबत सूचना दिल्या. सर्व योजनेच्या उद्दिष्टातील मंजूर लाभार्थ्यांना पहिला हप्ता वितरित करण्याकरिता संचिका तात्काळ सादर करण्याचे सांगितले.



## मा. उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या शुभहस्ते महा आवास अभियान पुरस्कार वितरण

**'महा आवास अभियान-ग्रामीण २.०'** अंतर्गत दिनांक २० नोव्हेंबर, २०२१ ते ३० जून, २०२२ या अभियान कालावधीत राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांचे मूल्यमापन करुन उत्कृष्ट काम करणाऱ्या संस्था व व्यक्तींना **'महा आवास अभियान पुरस्कार'** देऊन गौरव करण्याचे शासनाकडून सूचित करण्यात आले आहे. यामध्ये जिल्हास्तरीय महा आवास अभियान पुरस्कार वितरण स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून दिनांक १५ ऑगस्ट, २०२२ रोजी करण्यात आले.

त्यानुसार दिनांक १५ ऑगस्ट, २०२२ रोजी स्वातंत्र्य दिनी नागपूर येथे जिल्हास्तरीय महा आवास अभियान पुरस्कार मा. उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते वितरीत करून पुरस्कारार्थींना गौरविण्यात आले.

यावेळी प्रधानमंत्री आवासयोजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत योजनांतर्गत १.सर्वोत्कृष्ट तालुके, २.सर्वोत्कृष्ट क्लस्टर व ३.सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत यांना प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांकाचे जिल्हास्तरीय महा आवास अभियान पुरस्कार मा. उप मुख्यमंत्री महोदयांचे शुभहस्ते देवून गौरविण्यात आले.



## मा. मंत्री, ग्राम विकास यांच्या शुभहस्ते "महा आवास त्रैमासिक" चे प्रकाशन

ग्राम विकास विभागाच्या राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयामार्फत केंद्र व राज्य पुरस्कृत विविध ग्रामीण गृहनिर्माण योजना राबविण्यात येत आहे. या योजनांच्या प्रभावी अंलबजावणी, प्रचार, प्रसिध्दी व जन-जागृतीसाठी तसेच ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रातील घडामोडींना व्यापक प्रसिध्दी देण्यासाठी संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे यांनी 'महा आवास त्रैमासिक' प्रकाशित केले आहे.

माहे एप्रिल ते जून २०२२ या कालावधीचे महा आवास त्रैमासिकाचे प्रकाशन दिनांक २९ ऑगस्ट, २०२२ रोजी मा. मंत्री, ग्राम विकास श्री. गिरिश महाजन यांच्या शुभहस्ते व मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, श्री. राजेश कुमार यांच्या प्रमुख उपस्थिती करण्यात आले.

याप्रसंगी संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे, मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, डॉ. हेमंत वसेकर यांच्यासह ग्राम विकास विभागातील इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.



## ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रासाठी "महा आवास त्रैमासिक" एक स्तुत्य उपक्रम
### - मा. मंत्री, आदिवासी विकास, डॉ. विजयकुमार गावित

राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाने माहे एप्रिल ते जून २०२२ या कालावधीचे महा आवास त्रैमासिक प्रकाशीत केले असून दिनांक १४ सप्टेंबर, २०२२ रोजी मा. मंत्री, आदिवासी विकास डॉ.विजयकुमार गावित यांना या त्रैमासिकाचा अंक राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाचे उपसंचालक, श्री. नीलेश काळे यांनी दिला.

यावेळी मा. मंत्री महोदयांनी सांगितले की, या त्रैमासिकामुळे राज्यात ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रात सुरू असलेल्या घडोमोडींचा सर्वस्तरावर प्रसार होवून नावीन्यपूर्ण उपक्रमांना चालना मिळत आहे. ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रासाठी महा आवास त्रैमासिक एक स्तुत्य उपक्रम असल्याचे मा. मंत्री, आदिवासी विकास डॉ.विजयकुमार गावित यांनी सांगितले.



## ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या जन-जागृतीसाठी पंचायत समिती मुरुड मध्ये IEC उपक्रम

दिनांक १९ जुलै, २०२२ रोजी केंद्र व राज्य पुरस्कृत विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या प्रचार, प्रसिद्धी व जन-जागृतीसाठी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा रायगड यांचे मार्फत पंचायत समिती मुरुड मधील सर्व ग्रामपंचायतीमध्ये माहिती, शिक्षण व संवाद (IEC) उपक्रम राबविण्यात आले.

यामध्ये मुरूड तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतीमध्ये विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांचे बॅनर लावण्यात आले. ग्रामपंचायतीमध्ये डेमो हाऊस मॉडेल ठेवण्यात आले. त्याचप्रमाणे विविध ग्रामीण गृहनिर्माण योजना व नावीन्यपूर्ण उपक्रमांची माहिती दर्शक कॅलेंडर घरकुल लाभार्थ्यांना गट विकास अधिकारी श्री. वाणी यांच्या हस्ते वाटप करण्यात आले.



## हिंगोलीचे जिल्हाधिकारी यांच्या शुभहस्ते कळमनुरी येथे डेमो हाऊसचे लोकार्पण

घरकुलांची गुणवत्ता सुधारण्यासाठी व लाभार्थ्यांना मार्गदर्शक ठरण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत हिंगोली जिल्ह्यातील कळमनुरी पंचायत समिती आवारामध्ये डेमो हाऊसची निर्मिती करण्यात आली. दिनांक १७ सप्टेंबर, २०२२ रोजी या डेमो हाऊसचे लोकार्पण हिंगोली जिल्ह्याचे जिल्हाधिकारी श्री. जितेंद्र पापळकर यांच्या शुभहस्ते व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजय दैने यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.

या डेमो हाऊसच्या लोकार्पण सोहळ्याला पंचायत समिती कळमनुरी येथे जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक श्री. केंद्रे, आरोग्य अधिकारी श्री. पवार, कळमनुरीचे गट विकास अधिकारी श्री.प्रदिप बोंढारे, नोडल अधिकारी श्रीमती एस. पी. बेलुरे, ऑपरेटर श्री. गंगाधर शेळके, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता श्री. सिद्दीकी, श्री. नाईक, श्री. आखीब फारूखी, स.प्र.अ. श्री.एस.बी. घवाड, लेखाधिकारी श्री. हिबारे, यांच्यासह जिल्हा व तालुकास्तरावरील संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

याप्रसंगी जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यासह उपस्थितीत सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी डेमो हाऊस परिसरात वृक्षारोपन केले.




## डेमो हाऊस मध्ये सुरू करण्यात आलेल्या कॉप-शॉप मध्ये तिरंगा ध्वज विक्री

केंद्र शासनाने आझादी का अमृत महोत्स अंतर्गत हर घर तिरंगा उपक्रम राबविण्याचा निर्णय घेतला. त्याच धर्तीवर महाराष्ट्र राज्यात स्वातंत्र्याचा अमृत महोत्स अंतर्गत 'घरो घरो तिरंगा' उपक्रम राबविला. या उपक्रमांतर्गत दिनांक १३ ते १५ ऑगस्ट, २०२२ या कालावधीत घरो घरी तिरंगा उभारला.

याच उपक्रमाचे औचित्य साधून पालघर जिल्ह्यातील पंचायत समिती तलासरी मधील ग्रामीण गृहनिर्माण लाभार्थ्यांसाठी मार्गदर्शक उभारण्यात आलेल्या डेमो हाऊस मध्ये दिनांक ५ ऑगस्ट, २०२२ रोजी 'कॉप-शॉप' ची निर्मिती करण्यात आली.

तलासरी येथे स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत 'घरो घरो तिरंगा' उपक्रमासाठी महिला बचत गटांनी सुरू केलेल्या कॉप-शॉप मार्फत तिरंगा ध्वजाची विक्री करण्यात आली.

याप्रसंगी विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या प्रचार, प्रसिध्दी व जन-जागृतीसाठी LED व्हॅनचे उद्घाटन तलासरी पंचायत समितीचे सभापती यांच्या हस्ते व तहसीलदार, गट विकास अधिकारी, पंचायत समिती सदस्य तसेच इतर अधिकारी व कर्मचारी यांच्या उपस्थितीत करण्यात आले.



## मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय कृतीदलाची बैठक

केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व इतर राज्य पुरस्कृत ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत भूमिहिन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन देणेकरिता, राज्यस्तरीय कृतीदल (Task Force) स्थापन करण्यात आले आहे.

ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत राज्यात भूमिहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन देण्याचे काम गतीमान करण्यासाठी मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन श्री. मनुकुमार श्रीवास्तव यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय कृतीदलाची बैठक दिनांक २२ जुलै, २०२२ रोजी मा. मुख्य सचिव यांचे दालन, मंत्रालय, मुंबई येथे संपन्न झाली.

या बैठकीला मा. अतिरिक्त मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, मा. सचिव, आदिवासी विकास विभाग, मा. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, उप सचिव, केंद्रिय योजना, ग्राम विकास विभाग व सदस्य सचिव, राज्यस्तरीय कृतीदल तथा संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण उपस्थित होते. मा. विभागीय आयुक्त सर्व सदर बैठकीस व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे उपस्थित होते.

या बैठकीमध्ये भूमिहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्धता, त्याकरीता येणाऱ्या अडचणी व त्याकरीता केलेल्या उपाय योजना तसेच भूमिहीन लाभार्थ्यांसाठी राबविण्यात येत असलेले नावीन्यपूर्ण उपक्रम याविषयीचे सादरीकरण संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे यांनी केले.

त्यानुसार मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन श्री. मनुकुमार श्रीवास्तव यांनी राज्यातील ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत भूमिहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन देणेबाबत केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेतला. तसेच ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत भुमिहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन देण्यात विभागीय कृतीदलाने (Task Force) केलेली कार्यवाही व अडचणींबाबत चर्चा करण्यात आली. ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत भुमिहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन देण्यासंदर्भात ग्राम विकास विभागाने सादर केलेल्या मंत्रीमंडळ प्रस्तावाबाबत चर्चा मा. मुख्य सचिव यांनी सर्व समिती सदस्यां बरोबर केली.



## मा. सचिवांकडून शबरी व रमाई आवास योजनांचा आढावा


राज्यात केंद्र व राज्य पुरस्कृत विविध ग्रामीण गृहनिर्माण योजना राज्यव्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाकडून राबविण्यात येतात. राज्य पुरस्कृत शबरी आवास योजना व रमाई आवास योजना संदर्भात दिनांक १९ सप्टेंबर, २०२२ रोजी संबंधित विभागाचे मा. सचिव यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठका घेण्यात आल्या.

या बैठकांना राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माणचे संचालक डॉ. राजाराम दिघे यांच्यासह उपसंचालक (राज्य योजना) श्रीमती मंजिरी टकले, उपसंचालक (प्रधानमंत्री आवास योजना-ग्रा) श्री.नीलेश काळे व इतर संबंधित अधिकारी उपस्थित होते.

आदिवासी विकास विभाग अर्थसहाय्यीत शबरी आवास योजने संदर्भात मा. सचिव, आदिवासी विकास विभाग श्री. अनुपकुमार यादव यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १९ सप्टेंबर, २०२२ रोजी सकाळी १२.०० वाजता त्यांचे मंत्रालयीन दालन क्र. १३५, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई येथे बैठक आयोजित करण्यात आली.

त्याचप्रमाणे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग अर्थसहाय्यीत रमाई आवास योजने संदर्भात मा.सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, श्री. सुमंत भांगे यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १९ सप्टेंबर, २०२२ रोजी दुपारी ३.०० वाजता त्यांचे मंत्रालयीन दालनात मंत्रालय, मुंबई येथे बैठक आयोजित करण्यात आली.

या बैठकांमध्ये शबरी आवास योजना व रमाई आवास योजनेचे सादरीकरण डॉ. राजाराम दिघे यांनी



केले. या दोन्ही योजनांचे सन २०१६-१७ ते सन २०२१-२२ उद्दिष्ट व साध्य, अखर्चित निधी व त्याच्या खर्चाचे नियोजन व सन २०२२-२३ साठीचे उद्दिष्ट या विषयांवर चर्चा करण्यात आली.

याप्रसंगी संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण डॉ. राजाराम दिघे यांनी मा. सचिव, आदिवासी विकास विभाग व मा. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांना राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाने प्रकाशित केलेला माहे एप्रिल ते जुलै, २०२२ या कालावधीचा महा आवास त्रैमासिकाचा अंक भेट दिला.



## हिंगोलीत केंद्रीय पथकाकडून प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीणच्या घरकुलांची तपासणी

दिनांक ६ सप्टेंबर, २०२२ रोजी हिंगोली जिल्ह्यात कळमनुरी तालुक्यातील सेलसूरा व उमरा येथे प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनांच्या कामाची तपासणी केंद्रीय पथकाकडून करण्यात आली. या पथकामध्ये श्री. जोसेफ व श्री. विनोद यांचा समावेश होता.

या केंद्रीय पथकांने प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत पूर्ण झालेल्या घरकुलांची प्रत्यक्ष पहाणी व घरकुल लाभार्थ्यांशी चर्चा केली. तसेच या केंद्रीय पथकाने जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजय दैने व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक श्री. केंद्रे यांच्या सोबत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत घरकुल बांधकामाच्या प्रगतीबाबत चर्चा केली.

या केंद्रीय पथकाच्या दौऱ्याकरीता गट विकास अधिकारी श्री. प्रदिप बोंढारे, जिल्हा प्रोग्रामर श्री. गणेश पाटील, नोडल अधिकारी श्रीमती शारदा बेलूर, जिल्हा ऑपरेटर श्री. सचिन इंगोले, अभियंता श्री. एम. एम. सिद्दीकी, एम.ए. नाईक, तालुका ऑपरेटर श्री. गंगाधर शेळके, ग्रामसेवक, ग्रामपंचायतीचे रोजगार सेवक, लाभार्थी व ग्रामस्थ यांनी विशेष सहकार्य केले.



## हिमाचल प्रदेश व गुजरात राज्यातील ग्रामपंचायत सदस्यांकडून डेमो हाऊसचे कौतुक

भारत सरकारच्या पंचायत राज विभागाच्या सूचनेनुसार स्वच्छ हरित ग्राम व जलसमृद्धी गाव या शाश्वत विकास ध्येयांच्या दोन संकल्पनांवर आधारित राष्ट्रीय कार्यशाळाचे आयोजन जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, पुणे यांनी केले. या कार्यशाळेला देशभरातील ग्रामपंचायतीचे सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, पदाधिकारी व अधिकारी उपस्थित होते.

त्यांपैकी हिमाचल प्रदेश व गुजरात राज्यातील ग्रामपंचायतीचे सदस्य, युनिसेफचे प्रतिनिधी श्रीमती जोशी, श्री. निलेश पाटील व इतर पदाधिकारी यांनी दिनांक २४ सप्टेंबर, २०२२ रोजी पंचायत समिती जुन्नर अंतर्गत राबविलेल्या विविध उपक्रमांचा पाहणी केली. यावेळी त्यांनी पंचायत समिती आवारात प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत बांधण्यात आलेल्या डेमो हाऊसची पहाणी केली.

या डेमो हाऊस मध्ये विविध योजनांचे माहिती फलक, कमी खर्चात दर्जेदार घराची निर्मिती विषयी माहिती, विविध शासकीय योजनांशी कृती संगम करून लाभार्थ्यांना योजनांचा मिळणारा लाभ या विषयीची सर्व माहिती उपलब्ध होती. तसेच डेमो हाऊस परिसरात उभारण्यात आलेली परसबाग पाहून हिमाचल प्रदेश व गुजरात राज्यातील पदाधिकारी व युनिसेफचे प्रतिनिधी यांनी जुन्नर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी, पंचायत समितीचे अधिकारी व कर्मचारी यांचे भरभरून कौतुक केले.




## संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांच्या समन्वय बैठका

राज्यात महा आवास अभियान-ग्रामीण व अमृत घरकुल मोहिम अंतर्गत विविध उपक्रम राबवून ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या कामात आलेली गतिमानता व गुणवत्तेत सातत्य कायम ठेवण्यासाठी संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे यांनी माहे जुलै ते सप्टेंबर २०२२ या कालावधीत अमरावती, नाशिक, नागपूर, औरंगाबाद, पुणे व कोकण विभागांच्या भागधारकांच्या व्हिडिओ कॉन्फरन्सिंग व्दारे बैठका घेवून समन्वय ठेवला.

या बैठकांना विभागीय आयुक्त कार्यालयाचे उपायुक्त (विकास), सहाय्यक आयुक्त (विकास), जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक, सर्व पंचायत समितीचे गट विकास अधिकारी, विभागीय प्रोग्रामर, जिल्हास्तरीय प्रोग्रामर, डाटा एन्ट्री ऑपरेटर व संबंधित अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

या बैठकीमध्ये तालुक्यातील मनरेगा ऑपरेटर व घरकुल योजनेचा ऑपरेटर यांच्यामध्ये समन्वय ठेवून लाभार्थ्यांना घरकुलाचे हप्ते वेळेत वितरीत करणे, ग्रामसेवक/लाभार्थी/ग्रामीण गृहनिर्माण अभियंते यांच्याकडून प्रस्ताव/दस्ताऐवत वेळेत उपलब्ध करणे, घरकुलांना विनाविलंब मंजूरी देणे, भौतिकदृष्टया पुर्ण असलेली घरकुलांना शेवटचा हप्ता वितरीत करणे, भूमिहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करून देणे, अपुर्ण घरकुले पूर्ण करणे, घरकुले आर्थिक व भौतिकदृष्टया विहित वेळेत पुर्ण होणेसाठी सातत्याने पाठपुरावा करणे, प्रलंबीत घरकुले (Delayed Houses) लोक अदालत किंवा इतर मार्गाने पूर्ण करणे, आवासप्लस मधील जॉब कार्ड मॅपिंगचे काम पुर्ण करणे, अपात्र लाभार्थ्यांची रिमांड प्रक्रिया पुर्ण करणे, विविध योजनांच्या कृतीसंगमाचा लाभ घरकुल लाभार्थ्यांना देणे, जागेचा वाद, करारनामा अप्राप्त, मयत लाभार्थी, अकाउंट व्हेरिफिकेशन, राज्य योजनेतील बदली प्रस्ताव याबाबत ग्रामपंचायतनिहाय संपर्क अधिकारी नेमून लाभार्थी निहाय पडताळणी करणे, इ. बाबत संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे यांनी मार्गदर्शन केले.

तसेच प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत योजनेमधील घरकुलांना मंजूरी देणे, अपूर्ण घरकुले पूर्ण करणे, लाभार्थ्यांना सर्व योजनांचे हप्ते वितरीत करणे, राज्य योजनेतील घरकुलांचे आधार सिडींग पूर्ण करणे, तालुका व जिल्हा डेमो हाऊस पूर्ण करणे, महा आवास अभियान-ग्रामीण २.० पुरस्कार वितरण करणे व शासकीय जमीनीवरील निवासी अतिक्रमणे नियमित करणे अशा सूचना डॉ. राजाराम दिघे यांनी या बैठकांमध्ये केल्या.



## सोलापूर मध्ये अभिनव उपक्रम "अमृत घरकुल मोहिम अंतर्गत एक तास घरकुलासाठी"

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा सोलापूर यांनी अमृत घरकुल मोहिम अंतर्गत घरकुल उद्दिष्टपूर्तीसाठी सर्व पंचायत समितीमध्ये एक तास घरकुलासाठी हा उपक्रम राबविला. या उपक्रमांतर्गत अपूर्ण घरकुले पूर्ण करणे व घरकुलांचे काम तात्काळ सुरू करणे यासाठी जास्त उद्दिष्ट असणाऱ्या ग्रामपंचायतीची निवड केली.

त्यानुसार त्यांनी दिनांक २३ जुलै, २०२२ रोजी पंचायत समिती माळशिरस अंतर्गत सर्वात जास्त घरकुले अपूर्ण असणाऱ्या ग्रामपंचायतीमध्ये एकाच दिवशी ग्रामपंचायतस्तरावर लाभार्थी मेळावे आयोजित करण्यात आले. या लाभार्थी मेळाव्यांमध्ये घरकुलाचे काम सुरू न करणारे, अपूर्ण घरकुले व आर्थिक दृष्ट्या अपूर्ण घरकुले असणाऱ्या लाभार्थ्यांच्या अडचणींचे निराकरण करून घरकुल बांधकामास प्रोत्साहीत केले.

त्याचप्रमाणे करमाळा पंचायत समिती अंतर्गत ग्रामस्तरावर गट विकास अधिकारी श्री. राऊत यांचे मार्गदर्शनाखाली १५१ घरकुलांचे पाया खोदाकाम केले.

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव अंतर्गत अमृत घरकुल मोहिम यशस्वीतेसाठी व उद्दिष्टपूर्तीसाठी सोलापूर जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या एक तास घरकुलासाठी या उपक्रमाला अधिकारी, कर्मचारी व लाभार्थी यांच्याकडून चांगला प्रतिसाद मिळाला आहे.



## पालघर जिल्ह्यात घरकुल लाभार्थ्यांना बँकाचे कर्ज वाटप

दिनांक १ ऑगस्ट २०२२ रोजी पालघर जिल्हा वर्धापन दिन निमित्त घरकुलांना मंजूरी मिळालेल्या लाभार्थ्यांना घरकुल मंजूरी पत्र व घरकुल बांधकाम पुर्ण केलेल्या लाभार्थ्यांना प्रातिनिधीक स्वरूपात घरकुलाची चावी व प्रशस्तीपत्र प्रदान करण्यात आले.

या प्रसंगी पालघर जिल्ह्याचे मा. खासदार, मा. आमदार, मा. जिल्हा परिषद अध्यक्ष, जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक, पदाधिकारी, अधिकारी व घरकुल योजनांचे लाभार्थी उपस्थित होते.

यावेळी पालघर जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान व बँका यांच्या समन्वयातून केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण व राज्य पुरस्कृत शबरी, रमाई आवास योजना व आदिम आवास योजना मधील लाभार्थ्यांच्या महिला बचत गटांना बँकाकडून कर्जाची रक्कम धनादेश स्वरूपात प्रदान केली.



## ऊस तोड कामगारांनी स्थलांतर थांबवून घरकुल बांधकाम पूर्ण करून कुटुंबाला स्थर्य द्यावे

**- श्रीमती रश्मी खांडेकर, प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, परभणी**

राज्यात विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांची अंमलबजावणी करतांना स्थलांतरीत लाभार्थी ही मोठी अडचण आहे. याच अडचणीवर मार्ग काढण्यासाठी दिनांक २३ सप्टेंबर, २०२२ रोजी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक श्रीमती रश्मी खांडेकर यांनी पाथरी तालुक्यातील ग्रामपंचायत मरडसगाव येथे ऊस तोड कामगार तसेच स्थलांतरीत घरकुल लाभार्थी यांच्यासाठी ग्रामपंचायतीच्या समन्वयाने विशेष ग्रामसभेचे आयोजन केले.

यावेळी श्रीमती रश्मी खांडेकर यांच्यासह उप अभियंता श्री. एस. एस. वसेकर, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता श्री. कैलास अंभोरे, ग्रामसेवक श्री. मुंडे व समस्त ग्रामस्थ उपस्थित होते.

श्रीमती रश्मी खांडेकर यांनी ऊस तोड कामगारांच्या समस्या बाबत चर्चा केली. त्यांच्या समस्यांवर श्रीमती रश्मी खांडेकर यांनी उपस्थितांना मोलाचे मार्गदर्शन करून ऊस तोड कामगारांना स्थलांतर थांबवून घरकुल बांधकाम पूर्ण करून कुटुंबाला स्थर्य देणेकामी प्रोत्साहीत केले. तसेच श्रीमती रश्मी खांडेकर यांनी मरडसगाव गावातील विविध आवास योजनांच्या घरकुलांची पाहणी केली.



## ग्राम विकास व महसूल यंत्रणेच्या समन्वयाने घरकुल लाभार्थ्यांना जागेची उपलब्धता

दिनांक २६ जुलै, २०२२ रोजी पुणे जिल्ह्यातील हवेली तालुक्यांतर्गत ग्रामपंचायत सांगवी सांडस येथे घरकुल लाभार्थी मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यामध्ये न्हावी सांडस, बुर्कगाव, पेरणे ग्रामपंचायतीचे घरकुल लाभार्थी उपस्थित होते.

या घरकुल लाभार्थी मेळाव्यामध्ये भूमिहीन लाभार्थ्यांना ग्रामपंचायत क्षेत्रातील वन विभागाच्या जागा घरकुल बांधकामाकरीता उपलब्धतेबाबत प्रस्ताव सादर करावयाच्या पध्दती व कागद पत्रांच्या पुर्तते बाबत मार्गदर्शन करण्यात आले.

या लाभार्थी मेळाव्याला गट विकास अधिकारी श्री. भागवत, नायब तहसीलदार श्री. चाटे, वनीकरण अधिकारी श्रीमती दिया, वनपाल, तलाठी, ग्रामसेवक, सरपंच व घरकुल लाभार्थी उपस्थित होते.



# केंद्र व राज्य सरकार यांना ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रासंबंधी पॉलिसी इनपुट

## ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत पात्र परंतु भूमिहीन लाभार्थ्यांना जागेची उपलब्धता

**"सर्वांसाठी घरे - २०२४"** हे केंद्र व राज्य शासनाचे धोरण असून, त्यानुसार राज्यातील बेघर तसेच कच्च्या घरात वास्तव्यास असणाऱ्या पात्र लाभार्थ्यांना सन २०२४ पर्यंत स्वत:चे हक्काचे घर मिळावे असा प्रयत्न आहे. त्यानुसार राज्यात ग्रामीण भागातील बेघरांना घरकुल उपलब्ध करुन देण्यासाठी केंद्र व राज्य पुरस्कृत विविध ग्रामीण गृहनिर्माण योजना राबविण्यात येत आहेत. या योजनांतर्गत ज्या लाभार्थ्यांकडे स्वत:ची जागा आहे, अशा लाभार्थ्यांना २६९ चौ. फू. चटई क्षेत्र घरकुल बांधकामासाठी, सर्वसाधारण क्षेत्रात रु.१.२० लक्ष व नक्षलग्रस्त डोंगराळ क्षेत्रात रु. १.३० लक्ष एवढे अर्थसहाय्य देण्यात येते.

केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व अन्य ग्रामीण आवास योजनांमधील पात्र लाभार्थी केवळ जागे अभावी घरकुलाचा लाभ मिळण्यापासून वंचित आहेत. या भूमिहीन पात्र लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन देताना विविध अडचणी येत आहेत. या अडचणी विचारात घेऊन भूमिहीन पात्र लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन देण्यासाठी शासन निर्णय क्रमांकः प्राआयो-२०२१/प्र.क्र.८१/योजना-१०, दिनांक २२ ऑगस्ट, २०२२ शासन निर्णयान्वये पुढील प्रस्तावास शासनाने मान्यता दिली आहे.

१) विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांतील लाभार्थ्यांना पंडीत दीनदयाळ उपाध्याय जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेंतर्गत जागा खरेदी करताना मुद्रांक शुल्काची रक्कम रु.१०००/-इतकी आकारणे.

२) ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत पात्र लाभार्थ्यांना मोजणी शुल्कामध्ये अनुज्ञेय ५०% सवलत एकुण भुखांडाकरीता लागू न करता त्यांनी खरेदी केलेल्या जागेकरिताच लागू करणे.

३) विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांमधील लाभार्थ्यांना पंडीत दीनदयाळ उपाध्याय जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेअंतर्गत ५०० चौ.फु. कृषक जमीन खरेदी करतांना तुकडेबांदी कायद्यातील अट लागू होणार नाही अशी संबंधित अधिनियमात सुधारणा करणे.

४) पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी योजनेंतर्गत लाभार्थ्यांना दोन मजली (G+२) ऐवजी चार मजली (G+४) इमारत बांधण्यास मान्यता देणे.

५) विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनाच्या लाभार्थ्यांनी निवासी प्रयोजनार्थ अतिक्रमण केलेल्या गायरान जागा, विविध ग्रामीण गृहनिर्माण योजना या सार्वजनिक प्रयोजन असल्याने, त्या गायरान जागा सार्वानिक प्राधिकरण- **"ग्रामपंचायत"** यांना वर्ग करणे व ग्रामपंचायतीने निवासी कारणासाठी सदर गायरान जागा अभिन्यास मांजूर करुन घेवून त्याच लाभार्थ्यांना भाडेपट्ट्याने देण्याची कार्यपध्दती ग्रामविकास निभागाने निश्चित करण्यास मान्यता देणे. यासाठी आवश्यकता असल्यास संबंधित अधिनियमात तरतूद करणे.

६) ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या लाभार्थ्यांनी महसुल विभागा व्यतिरिक्त इतर प्रशासकीय विभागाच्या जमिनीवर केलेले अतिक्रमण जसे-जलसंपदा विभाग, शेती महामंडळ, सार्वजनिक बांधकाम विभाग इत्यादी, नियमानुकूल करण्याचे प्रस्ताव जिल्हाधिकारी यांनी संबंधित प्रशासकीय विभागाच्या मंत्रालयीन सचिवांकडे मान्यतेसाठी सादर करणे, संबंधित प्रशासकीय विभागाच्या मंत्रालयीन सचिवाने सदर प्रस्तावास, प्रस्ताव प्राप्त झाल्यापासून ९० दिसांच्या आत मान्यता देणे, तसे न केल्यास या प्रस्तावांना संबंधित प्रशासकीय विभागाची मान्यता आहे असे समजणे, संबंधित प्रशासकीय विभागाने अतिक्रमण नियमानुकूल करण्याचा प्रस्ताव नामांजूर केल्यास असे प्रस्ताव पुनर्विचार्थ मुख्य सचिव यांचेकडे सादर करणे, या कार्यवाहीस अधिन राहून जिल्हाधिकारी यांना महसूल विभागाव्यतिरिक्त अन्य प्रशासकीय विभागाच्या जमीनी वरील अतिक्रमण नियमानुकूल करण्याचे अधिकार प्रदान करण्यास मान्यता देणे.

७) ग्राम निकास विभागाच्या अतिक्रमण नियमानुकूल करण्याच्या योजनेअंतर्गत शासकीय जमीनीवरील निवासी प्रयोजनार्थ ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या लाभार्थ्यांनी केलेली अतिक्रमणे नियमानुकूल करताना महसूल विभागाच्या दिनांक ४ एप्रिल, २००२ च्या शासन निर्णयातील तरतुदीप्रमाणे मागासवर्गीय लाभार्थ्यांना विनामूल्य नियमानुकूल करून देण्यास मान्यता देणे.



# प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण
## संचित प्रगती अहवाल - ३० सप्टेंबर २०२२

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट (PWL+Awaas+) | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक | राष्ट्रीय रँक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | गोंदिया | ९६०४९ | ९०२१४ | ७६२८२ | ८४.५६% | १ | २४५ |
| २ | नागपूर | ४१२६६ | ३४५४२ | २७५१३ | ७९.६५% | ३ | ५१८ |
| ३ | वर्धा | १९७१२ | १६४४२ | १२३६३ | ७५.१९% | ६ | ४३८ |
| ४ | भंडारा | ६५३२६ | ६१६६१ | ४३१५६ | ६९.९९% | १२ | ४३९ |
| ५ | चंद्रपूर | ४३७७९ | ३८४५८ | २५९३२ | ६७.४३% | १६ | ४२३ |
| ६ | गडचिरोली | ३१४२० | ३०५६० | १९२०८ | ६२.८५% | २३ | ३६० |
| | नागपूर विभाग | २९७५५२ | २७१८७७ | २०४४५४ | ७५.२०% | १ | |
| ७ | रायगड | ९७८१ | ९७६१ | ७९२१ | ८१.१५% | २ | ३१० |
| ८ | सिंधुदुर्ग | ५२९० | ४८०१ | ३६३९ | ७५.८०% | ५ | २४४ |
| ९ | पालघर | ३४७७३ | ३४०४२ | २४८५३ | ७३.०१% | १० | २५२ |
| १० | ठाणे | ९५२६ | ८९२५ | ६४४६ | ७२.२२% | ११ | २३३ |
| ११ | रत्नागिरी | १०१४१ | ९५७५ | ६०७४ | ६३.४४% | २० | १४५ |
| | कोकण विभाग | ६९५११ | ६७१०४ | ४८९३३ | ७२.९२% | २ | |
| १२ | नाशिक | ९०२०६ | ८६९१२ | ६४९१३ | ७४.६९% | ८ | २७३ |
| १३ | नंदुरबार | ११९३२८ | ११३८३५ | ८४४९७ | ७४.२३% | ९ | ३९१ |
| १४ | धुळे | ६४५३७ | ६२६८१ | ४१८८२ | ६६.८२% | १७ | २९८ |
| १५ | अहमदनगर | ६२९३० | ५६१७० | ३६८७७ | ६५.६५% | १८ | ४९३ |
| १६ | जळगाव | ८१४२४ | ७५९८३ | ४७८५० | ६२.९७% | २२ | ५१५ |
| | नाशिक विभाग | ४१८४२५ | ३९५५८१ | २७६०१९ | ६९.७८% | ३ | |
| १७ | अकोला | ५१०१५ | ४२५३० | ३२७२४ | ७६.९४% | ४ | ४९१ |
| १८ | अमरावती | ९७६७७ | ८१००५ | ६०५२३ | ७४.७२% | ७ | ५२४ |
| १९ | बुलढाणा | ४५७१४ | ३२६०९ | २०५५० | ६३.०२% | २१ | ४४५ |
| २० | यवतमाळ | ६५६७६ | ५६१०६ | ३२१८७ | ५७.३७% | २६ | ३०१ |
| २१ | वाशिम | २०६२४ | १४९०९ | ७५८१ | ५०.८५% | २९ | ४०२ |
| | अमरावती विभाग | २८०७०६ | २२७१५९ | १५३५६५ | ६७.६०% | ४ | |
| २२ | पुणे | २२६८० | १८०४९ | १२४३१ | ६८.८७% | १३ | ५०९ |
| २३ | कोल्हापूर | १७९४९ | १७२२२ | ११८०१ | ६८.५२% | १४ | ३२४ |
| २४ | सोलापूर | ५३७६७ | ४३१४७ | २९४३१ | ६८.२१% | १५ | ४४८ |
| २५ | सांगली | २३१२७ | २००१३ | १२९६५ | ६४.७८% | १९ | ५३५ |
| २६ | सातारा | १७६२४ | १४५४६ | ९०८७ | ६२.४७% | २४ | ५०८ |
| | पुणे विभाग | १३५१४७ | ११२९७७ | ७५७१५ | ६७.०२% | ५ | |
| २७ | हिंगोली | १८१७८ | १४६७९ | ८७४४ | ५९.५७% | २५ | २२७ |
| २८ | औरंगाबाद | ३६८६६ | ३५१४८ | १८२४७ | ५१.९१% | २७ | २८९ |
| २९ | जालना | २४६२८ | १९४६९ | १००६३ | ५१.६९% | २८ | ४२२ |
| ३० | नांदेड | ६९७५२ | ६२६३५ | ३१७९१ | ५०.७६% | ३० | ५१९ |
| ३१ | बीड | ३५२६३ | ३०७८८ | १५०५३ | ४८.८९% | ३१ | ४३४ |
| ३२ | लातूर | २१०५७ | १७८७० | ८२२० | ४६.००% | ३२ | ४५९ |
| ३३ | उस्मानाबाद | १४७०८ | १०६४८ | ४६४६ | ४३.६३% | ३३ | ३३३ |
| ३४ | परभणी | १९१७४ | १६३१९ | ५९८४ | ३६.६७% | ३४ | २२१ |
| | औरंगाबाद विभाग | २३९६२६ | २०७५५६ | १०२७४८ | ४९.५०% | ६ | |
| | एकूण | १४४०९६७ | १२८२२५४ | ८६१४३४ | ६७.१८% | | |

# रमाई आवास योजना
## संचित प्रगती अहवाल - ३० सप्टेंबर २०२२

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ठाणे | १२५६ | १०१७ | ८९६ | ८८.१०% | १ |
| २ | रत्नागिरी | ६६८४ | ६१७२ | ५३६८ | ८६.९७% | २ |
| ३ | सिंधुदुर्ग | २०३१ | २०१५ | १६६४ | ८२.५८% | ३ |
| ४ | रायगड | २०३९ | २०२८ | १५४९ | ७६.३८% | ११ |
| ५ | पालघर | ४९८ | ४५८ | ३४६ | ७५.५५% | १२ |
| | कोकण विभाग | १२५०८ | ११६९० | ९८२३ | ८४.०३% | १ |
| ६ | सातारा | १०३२८ | १०३२२ | ८४१४ | ८१.५२% | ५ |
| ७ | कोल्हापूर | १२४४३ | १२४४३ | ९९१२ | ७९.६६% | ९ |
| ८ | सांगली | ८६१४ | ८२०३ | ६०४७ | ७३.७२% | १७ |
| ९ | सोलापूर | १७६८९ | १७५४६ | १२८१९ | ७३.०६% | १८ |
| १० | पुणे | ९५१७ | ९४४२ | ६६२७ | ७०.१९% | २० |
| | पुणे विभाग | ५८५९१ | ५७९५६ | ४३८१९ | ७५.६१% | २ |
| ११ | नागपूर | ८०३९ | ७८०७ | ६३४३ | ८१.२५% | ६ |
| १२ | भंडारा | १२४८० | १०६७७ | ८६४२ | ८०.९४% | ७ |
| १३ | गडचिरोली | ६८८० | ५७९० | ४६२६ | ७९.९०% | ८ |
| १४ | गोंदिया | १०१२७ | ९१६६ | ६८५० | ७४.७३% | १६ |
| १५ | चंद्रपूर | २२८७३ | १६८८६ | ११७८३ | ६९.७८% | २१ |
| १६ | वर्धा | ७५०९ | ७४७९ | ५०९२ | ६८.०८% | २४ |
| | नागपूर विभाग | ६७९०८ | ५७८०५ | ४३३३६ | ७४.९७% | ३ |
| १७ | अहमदनगर | २८४३४ | २८०३८ | २०९५४ | ७४.७३% | १५ |
| १८ | जळगाव | १६७५८ | १५३९४ | १०६१७ | ६८.९७% | २२ |
| १९ | नाशिक | १२३३८ | ११०७८ | ७६२३ | ६८.८१% | २३ |
| २० | नंदुरबार | ३५२२ | २९३९ | १९५५ | ६६.५२% | २७ |
| २१ | धुळे | ८५४९ | ७५०१ | ४७६६ | ६३.५४% | २८ |
| | नाशिक विभाग | ६९६०१ | ६४९५० | ४५९१५ | ७०.६९% | ४ |
| २२ | लातूर | २६२४२ | १९१६८ | १५६६० | ८१.७०% | ४ |
| २३ | परभणी | १६८४१ | १५१४४ | ११८९१ | ७८.५२% | १० |
| २४ | हिंगोली | १४२२८ | ७४२० | ५५८४ | ७५.२६% | १३ |
| २५ | औरंगाबाद | २२२३३ | १५२४३ | ११३९४ | ७४.७५% | १४ |
| २६ | नांदेड | २१३०० | १५०८३ | ९२६४ | ६१.४२% | ३० |
| २७ | उस्मानाबाद | २३६६४ | १४५५१ | ८५२१ | ५८.५६% | ३१ |
| २८ | बीड | २५७३५ | १९५६५ | ११०६२ | ५६.५४% | ३२ |
| २९ | जालना | १९२४६ | १६९६७ | ६२०२ | ३६.५५% | ३४ |
| | औरंगाबाद विभाग | १६९४८९ | १२३१४१ | ७९५७८ | ६४.६२% | ५ |
| ३० | यवतमाळ | १४३४१ | १३८८९ | ९९०१ | ७१.२९% | १९ |
| ३१ | अमरावती | १४९३७ | १२८६५ | ८७३१ | ६७.८७% | २५ |
| ३२ | अकोला | १८०९२ | १४४१२ | ९६१० | ६६.६८% | २६ |
| ३३ | वाशिम | ९१६६ | ८५२६ | ५३३३ | ६२.५५% | २९ |
| ३४ | बुलढाणा | १८५५४ | १७९५९ | ९४५९ | ५२.६७% | ३३ |
| | अमरावती विभाग | ७५०९० | ६७६५१ | ४३०३४ | ६३.६१% | ६ |
| | एकूण | ४५३१८७ | ३८३१९३ | २६५५०५ | ६९.२९% | |

# शबरी आवास योजना

## संचित प्रगती अहवाल - ३० सप्टेंबर २०२२

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कोल्हापूर | ३० | १३ | १३ | १००% | १ |
| २ | सोलापूर | ६८५ | ६२६ | ५४६ | ८७.२२% | ५ |
| ३ | सांगली | ६० | ५० | ४२ | ८४.००% | १० |
| ४ | पुणे | २६७२ | २६५७ | २२४९ | ८४.६४% | ९ |
| ५ | सातारा | १६७ | १३० | ११२ | ८६.१५% | ६ |
| | पुणे विभाग | ३६१४ | ३४७६ | २९६२ | ८५.२१% | १ |
| ६ | हिंगोली | ३४३२ | ३०८७ | २७३८ | ८८.६९% | ४ |
| ७ | जालना | ५६४ | ४७३ | ३९० | ८२.४५% | ११ |
| ८ | लातूर | ६९० | ४८८ | ३९० | ७९.९२% | १७ |
| ९ | औरंगाबाद | २५३९ | २४०३ | १८५७ | ७७.२८% | २१ |
| १० | नांदेड | १४९१ | १०५० | ८३५ | ७९.५२% | १९ |
| ११ | परभणी | ७५२ | ७४२ | ५९३ | ७९.९२% | १६ |
| १२ | बीड | ६५८ | ५१० | ३४८ | ६८.२४% | २७ |
| १३ | उस्मानाबाद | २९३ | २८४ | १४९ | ५२.४६% | ३४ |
| | औरंगाबाद विभाग | १०४१९ | ९०३७ | ७३०० | ८०.७८% | २ |
| १४ | सिंधुदुर्ग | २३ | २३ | २३ | १००.००% | २ |
| १५ | ठाणे | १८८२ | १८७० | १६६५ | ८९.०४% | ३ |
| १६ | रायगड | १७७० | १७६७ | १५२० | ८६.०२% | ७ |
| १७ | रत्नागिरी | २३८ | २३२ | १९१ | ८२.३३% | १२ |
| १८ | पालघर | ७१२५ | ७१२१ | ५३६५ | ७५.३४% | २३ |
| | कोकण विभाग | ११०३८ | ११०१३ | ८७६४ | ७९.५८% | ३ |
| १९ | अहमदनगर | ३८४६ | ३८४४ | ३१३१ | ८१.४५% | १३ |
| २० | नाशिक | १०९४० | १०९२२ | ८६९३ | ७९.५९% | १८ |
| २१ | जळगाव | ५२८९ | ५२८४ | ४२६५ | ८०.७२% | १५ |
| २२ | धुळे | ७८६० | ७८५२ | ६१२८ | ७८.०४% | २० |
| २३ | नंदुरबार | १०८५२ | १०५७५ | ७१८३ | ६७.९२% | २८ |
| | नाशिक विभाग | ३८७८७ | ३८४७७ | २९४०० | ७६.४१% | ४ |
| २४ | अमरावती | ४३५९ | ४१४४ | ३१५७ | ७६.१८% | २२ |
| २५ | बुलढाणा | ११३६ | ११०७ | ८२५ | ७४.५३% | २४ |
| २६ | यवतमाळ | ५५७२ | ५५६३ | ४१०२ | ७३.७४% | २६ |
| २७ | अकोला | १६८२ | १३०१ | ८५२ | ६५.४९% | ३१ |
| २८ | वाशिम | ८०१ | ७७२ | ४१४ | ५३.६३% | ३३ |
| | अमरावती विभाग | १३५५० | १२८८७ | ९३५० | ७२.५५% | ५ |
| २९ | वर्धा | २८०२ | २७९९ | २३९७ | ८५.६४% | ८ |
| ३० | नागपूर | २६१८ | २५९१ | २०९२ | ८०.७४% | १४ |
| ३१ | चंद्रपूर | ६०१६ | ५६९१ | ४२३० | ७४.३३% | २५ |
| ३२ | गोंदिया | २५९९ | २४४९ | १६२४ | ६६.३१% | ३० |
| ३३ | भंडारा | ४६६१ | ४४६९ | २९९८ | ६७.०८% | २९ |
| ३४ | गडचिरोली | ५७३५ | ५६५० | ३२६२ | ५७.७३% | ३२ |
| | नागपूर विभाग | २४४३१ | २३६४९ | १६६०३ | ७०.२१% | ६ |
| | एकूण | १०१८३९ | ९८५३९ | ७४३७९ | ७५.४८% | |

# पारधी आवास योजना
## संचित प्रगती अहवाल - ३० सप्टेंबर २०२२

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | वर्धा | ५० | ५० | ४६ | ९२.००% | १० |
| २ | चंद्रपूर | ३५ | १९ | १७ | ८९.४७% | १२ |
| ३ | नागपूर | ४८ | ४८ | ४० | ८३.३३% | १६ |
| नागपूर विभाग | | १३३ | ११७ | १०३ | ८८.०३% | १ |
| ४ | कोल्हापूर | ७ | ७ | ७ | १००% | २ |
| ५ | सोलापूर | २३१ | २०२ | १९३ | ९५.५४% | ७ |
| ६ | सातारा | २४ | २४ | २० | ८३.३३% | १७ |
| ७ | सांगली | ३८ | २६ | २१ | ८०.७७% | १८ |
| ८ | पुणे | १८८ | १५८ | ११९ | ७५.३२% | २१ |
| पुणे विभाग | | ४८८ | ४१७ | ३६० | ८६.३३% | २ |
| ९ | हिंगोली | ३५ | ३५ | ३५ | १००% | १ |
| १० | लातूर | १७ | १३ | १३ | १००% | ३ |
| ११ | नांदेड | ५० | ४२ | ४२ | १००% | ४ |
| १२ | परभणी | ५६ | ५६ | ५६ | १००% | ५ |
| १३ | बीड | ९२ | ८६ | ७६ | ८८.३७% | १४ |
| १४ | उस्मानाबाद | २४७ | २४७ | १९९ | ८०.५७% | १९ |
| १५ | औरंगाबाद | ५७ | ५१ | ४० | ७८.४३% | २० |
| १६ | जालना | ३८ | ३२ | २० | ६२.५०% | २४ |
| औरंगाबाद विभाग | | ५९२ | ५६२ | ४८१ | ८५.५९% | ३ |
| १७ | वाशिम | ६४ | ६४ | ६२ | ९६.८८% | ६ |
| १८ | बुलढाणा | ३७१ | ३७१ | ३५१ | ९४.६१% | ९ |
| १९ | अमरावती | ४५१ | ४४४ | ४०२ | ९०.५४% | ११ |
| २० | अकोला | ३७४ | ३७३ | ३३० | ८८.४७% | १३ |
| २१ | यवतमाळ | ५९४ | ५९१ | ४२२ | ७१.४०% | २३ |
| अमरावती विभाग | | १८५४ | १८४३ | १५६७ | ८५.०२% | ४ |
| २२ | धुळे | ४३२ | ४३२ | ४०९ | ९४.६८% | ८ |
| २३ | अहमदनगर | १९८ | १९८ | १७३ | ८७.३७% | १५ |
| २४ | जळगाव | ५७० | ५६२ | ४०७ | ७२.४२% | २२ |
| २५ | नाशिक | १४३ | १३७ | ७९ | ५७.६६% | २५ |
| २६ | नंदुरबार | १० | ० | ० | ०.००% | २६ |
| नाशिक विभाग | | १३५३ | १३२९ | १०६८ | ८०.३६% | ५ |
| एकूण | | ४४२० | ४२६८ | ३५७९ | ८३.८६% | |

# आदिम आवास योजना

## संचित प्रगती अहवाल - ३० सप्टेंबर २०२२

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | नाशिक | ९८ | १२ | १२ | १००% | १ |
| नाशिक विभाग | | ९८ | १२ | १२ | १००% | १ |
| २ | गडचिरोली | १७७८ | १६९० | १२३८ | ७३.२५% | ३ |
| ३ | चंद्रपूर | ७२३ | ४५८ | २५७ | ५६.११% | ७ |
| ४ | वर्धा | ३९६ | २०० | ३१ | १५.५०% | ११ |
| नागपूर विभाग | | २८९७ | २३४८ | १५२६ | ६४.९९% | २ |
| ५ | सिंधुदुर्ग | ६६ | ४९ | ४८ | ९७.९६% | २ |
| ६ | रायगड | १३९४ | १३९३ | ९३८ | ६७.३४% | ४ |
| ७ | ठाणे | १५७८ | १४३३ | ८८६ | ६१.८३% | ५ |
| ८ | पालघर | ११३१ | ११२७ | ६०९ | ५४.०४% | ८ |
| ९ | रत्नागिरी | ८ | ८ | ० | ०.००% | १२ |
| कोकण विभाग | | ४१७७ | ४०१० | २४८१ | ६१.८७% | ३ |
| १० | नांदेड | ४१९ | १८१ | १०२ | ५६.३५% | ६ |
| औरंगाबाद विभाग | | ४१९ | १८१ | १०२ | ५६.३५% | ४ |
| ११ | यवतमाळ | ४७८४ | ३०४३ | ११७२ | ३८.५१% | ९ |
| अमरावती विभाग | | ४७८४ | ३०४३ | ११७२ | ३८.५१% | ५ |
| १२ | पुणे | ७५ | १९ | ३ | १५.७९% | १० |
| पुणे विभाग | | ७५ | १९ | ३ | १५.७९% | ६ |
| एकूण | | १२४५० | ९६१३ | ५२९६ | ५५.०९% | |

# यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना

## संचित प्रगती अहवाल - ३० सप्टेंबर २०२२

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | गोंदिया | २० | २० | २० | १००% | १ |
| नागपूर विभाग | | २० | २० | २० | १००% | १ |
| २ | लातूर | १० | १० | ७ | ७०.००% | ३ |
| ३ | उस्मानाबाद | ३६७ | ३२१ | १८४ | ५७.३२% | ४ |
| औरंगाबाद विभाग | | ३७७ | ३३१ | १९१ | ५७.७०% | २ |
| ४ | अमरावती | ३३७ | १४६ | २१ | १४.३८% | ६ |
| ५ | यवतमाळ | १४० | १३९ | २० | १४.३९% | ५ |
| अमरावती विभाग | | ४७७ | २८५ | ४१ | १४.३९% | ३ |
| ६ | सोलापूर | ४ | ४ | ३ | ७५.००% | २ |
| ७ | कोल्हापूर | ६५ | ६५ | ० | ०.००% | ८ |
| ८ | सातारा | १०८ | १०४ | ० | ०.००% | १० |
| पुणे विभाग | | १७७ | १७३ | ३ | १.७३% | ४ |
| ९ | अहमदनगर | २० | २० | ० | ०.००% | ७ |
| नाशिक विभाग | | २० | २० | ० | ०.००% | 5 |
| १० | रत्नागिरी | ९५ | ७९ | ० | ०.००% | ९ |
| कोकण विभाग | | ९५ | ७९ | ० | ०.००% | ६ |
| एकूण | | ११६६ | ९०८ | २५५ | २८.०८% | |

# कॉप-शॉप मुळे मिळाला सन्मानजनक रोजगार

बल्लारपुर हा महाराष्ट्र राज्यातील चंद्रपुर जिल्ह्यामधील एक तालुका आहे. महाआवास अभियान-ग्रामीण मध्ये घरांची गुणवत्ता सुधारण्यासाठी व लाभार्थअयांना मार्गदर्शक ठरण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत जिल्हातील प्रत्येक पंचायत समिती आवारामध्ये डेमो हाऊस उभारण्याचा उपक्रम शासनाने हाती घेतला आणि या उपक्रमाला सर्व पंचायत समितीस्तरावरून भरभरून प्रतिसादही मिळाला. पंचायत समिती आवारात डेमो हाऊस बांधकामाकरिता शासनाकडुन निधीची उपलब्धता करुन देण्यात आली होती. परंतु पंचायत समिती, बल्लारपुरमध्ये सुरूवातीला डेमो हाऊस बांधकामासाठी जागा उपलब्ध होत नव्हती. त्यामुळे पंचायत समितीच्या अधिकाऱ्यांपुढे मोठा प्रश्न निर्माण झाला होता. याविषयी तहसिलदार व गट विकास अधिकारी यांनी एकत्र प्रयत्न करून डेमो हाऊस बांधकामासाठी पंचायत समिती, बल्लारपूरच्या आवारात जागेची उपलब्धता करण्यात आली.

डेमो हाऊससाठी जागा उपलब्ध होताच डेमो हाऊसचे बांधकाम अवघ्या काही महिन्यातच पुर्ण करण्यात आले. डेमो हाऊसला सुबक रंगरगोटी करुन त्या परिसरात वृक्षारोपणही करण्यात आले. पदाधिकारी व लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत डेमो हाऊसचे लोकार्पण व कॉप-शॉपचा उद्‌घाटनसोहळा संपन्न झाला. हे डेमो हाऊस अगदी अल्प कालावधीत दर्जेदार व कमी खर्चात बांधले गेले असुन बल्लारपुर मधील १७ ग्रामपंचायती करिता एक आदर्श ठरले आहे. या डेमो हाऊसला घरकुल लाभार्थी ग्रामस्थ भेटी देत असून याचे कौतुक सर्वस्तरावरून होत आहे.

शासनाच्या सूचनेनुसार डेमो हाऊस मध्ये उमेद अभियाना यांच्या सहाय्याने जागृती बचत गट यांच्या मार्फत कॉप-शॉप सुरू करण्यात आले आहे. त्यामुळे या बचत गटाला रोजगाराचे साधन उपलब्ध झाले आहे. हे कॉप-शॉप जागृती बचत गटाच्या सदस्य श्रीमती सुजाता रुपेश वनकर राहणार बामणी चालवतात. श्रीमती सुजाता रुपेश वनकर ह्या कित्येक दिवसांपासुन रोजगाराच्या शोधात होत्या. पती अपंग असल्यामुळे संपूर्ण परिवाराची जबाबदारी त्यांच्यावर होती. त्यासोबतच त्यांच्या परिवारात एक मुलगी, एक मुलगा व सासु यांचीही पुर्ण जबाबदारी ही श्रीमती सुजाता वनकर यांचेवर होती.

अशातच श्रीमती सुजाता वनकर यांना शासनाच्या डेमो हाऊस मधील कॉप-शॉप या नावीन्यपूर्ण उपक्रमाची माहिती मिळाली. त्यानी थोडाही वेळ न घालवता उमेद मधील तालुका समन्वयकांशी संपर्क साधुन कॉप-शॉप मधे कॅंटिन सुरू करण्याचा प्रस्ताव मांडला. त्यांच्या या प्रस्तावाबाबत तालुका समन्वयकांनी गट विकास अधिकारी यांचेशी चर्चा करून श्रीमती सुजाता वनकर यांना कॉप-शॉप मधे कॅंटिन सुरू करण्यास परवानगी दिली. त्यानुसार त्यांनी डेमो हाऊसमध्ये कॉप-शॉप सुरू केले.

शासनाच्या डेमो हाऊसमध्ये कॉप-शॉप या नावीन्यपूर्ण उपक्रमामुळे श्रीमती सुजाता रुपेश वनकर यांना रोजगाराची संधी मिळाली. त्यांनी या संधीच सोनं करत सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत विवीध प्रकाराचे चविष्ठ खादय पदार्थ विक्री करीता ठेवले. त्यासोबतच नजिकचे पंचायत समिती व तहसिल कार्यालयामध्ये चहा, नाशता व जेवण पोहचविण्यासही सुरूवात केली. त्यासोबतच घरगुती बनवलेले लोणची, पापड, बटाटा चिप्स व इतर गृह उपयोगी वस्तु विक्री करीता कॉप-शॉप मध्ये ठेवल्या. श्रीमती सुजाता रुपेश वनकर यांचे रोजचे उत्पन्न सरासरी ८०० ते १००० रूपये असून कॉप-शॉपमुळे त्यांचे जिवनमान उंचावले आहे. याकरीता श्रीमती सुजाता रुपेश वनकर यांनी शासनाचे व पंचायत समिती, बल्लारपुर कार्यालयातील सर्व अधिकारी कर्मचारी याचे आभार मानले आहे.






# घरकुलासह मिळाला इतर योजनांचाही लाभ

श्रीमती वर्षा संजयराव खैरे या ग्राम पंचायत मनभा तालुका कारंजा जिल्हा वाशिम येथिल रहिवासी असुन त्यांचे पुर्वीचे घर साधे मातीचे व पत्राचे होते. पावसाळ्यात घरात पाणी गळत असत तर वादळ वारे सुटल्यानंतर त्यांच्या मनात भिती निर्माण व्हायाची की घराचे छप्पर उडते की काय? माझे पक्के घर आयुष्यामध्ये पुर्ण होणार किंवा नाही याबाबत त्यांना कायम प्रश्न निर्माण होत होता.

त्यांना शासनाच्या घरकुल योजना थोडी फार माहिती होती. परंतु संपूर्ण माहितीसाठी श्रीमती वर्षा संजयराव खैरे यांनी ग्रामपंचायत कार्यालय जावून चौकशी केली. गांवामध्ये इतर लाभार्थ्यांना शासनाच्या घरकूल योजनांचा लाभ मिळत आहे. त्याप्रमाणे मला मिळेल का? त्याकरीता नियम, अटी व शर्ती काय आहेत व काय अटी आहेत? याची सखोल चौकशी श्रीमती वर्षा संजयराव खैरे यांनी ग्रामसेवकाकडे केली. याविषयी ग्रामसेवक यांनी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत घरकुलाची माहिती दिली. या योजनेतून तुम्हाला घरकुलाचा लाभ मिळेल असे सांगीतले. त्यानुसार श्रीमती वर्षा संजयराव खैरे यांनी आवश्यक सर्व कागदपत्रांची पुर्तता करुन ग्रामपंचायत कार्यालयात सादर केली. ग्रामसेवक यांनी ग्रामसभेमध्ये ठराव घेवून श्रीमती वर्षा संजयराव खैरे यांचा प्रस्ताव घरकुल मंजूरीसाठी सादर केला.

सन २०२०.२१ मध्ये प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत श्रीमती वर्षा संजयराव खैरे यांना घरकुल मंजूर झाले. त्यानंतर पंचायत समितीस्तरावर डेटा एन्ट्री ऑपरेटर यांनी आधार कार्ड, नमुना नंबर ८ अ, बँक पासबुक, जॉबकार्ड इत्यादी कागदपत्रांची पुर्तता करण्यास सांगीतले. त्यानुसार श्रीमती वर्षा संजयराव खैरे यांनी आवश्यक कागदपत्रे पंचायत समिती कार्यालयात सादर करताच गट विकास अधिकारी, पंचायत समिती कारंजा यांनी घरकुलाचा पहिला हप्ता श्रीमती वर्षा संजयराव खैरे यांच्या बँक खात्यात अग्रीम स्वरुपात जमा केला. त्यातून त्यांना घरकुल बांधकामास विनाविलंब सुरूवात केली. त्यांच्या घरकुल बांधकामाच्या टप्प्यानुसार त्यांना घरकुलाचे सर्व हप्ते वेळेत मिळाल्याने त्यांचे घरकुल वेळेत पूर्ण झाले. श्रीमती वर्षा संजयराव खैरे यांना घरकुल बांधकामासाठी ग्रामसेवक, ग्रामरोगाार सेवक, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांनी वेळोवेळी आवश्यक मार्गदर्शन व सहकार्य केले.

श्रीमती वर्षा संजयराव खैरे यांना घरकुल बांधकामासाठी प्रधानमंत्री आवास योजने मधून रक्कम रुपये १,२०,०००/- मिळाले. यासोबतच स्वच्छ भारत मिशन मधून शौचालयासाठी रक्कम रुपये १२,०००/-, मनरेगा मधून रक्कम रुपये १८,०००/- असे एकुण रक्कम रूपये १,५०,०००/- मिळाले. त्यामुळे त्यांनी पक्क्या घराचे बांधकाम शौचालयासह पूर्ण केले आहे.

कित्येक वर्षांपासून पाहिलेले पक्क्या घरकुलाचे स्वप्न पुर्ण झाल्यामुळे मी आता खुप आनंदी व समाधानी आहे. पावसाळ्यामध्ये वारा वादळ आला तरी भिती वाटत नाही. प्रधानमंत्री उज्वला गॅस योजने मधून मला गॅस पण मिळालेले आहे. त्यामुळे मला स्वयंपाक करण्यासाठी जास्त वेळ लागत नाही. यापुर्वी चुल आणि पावसाळ्यात ओली लाकडे यामुळे तासंतास चुल पेटत नव्हती. त्यातच डोळयामध्ये धुर जात होता आणि डोळ्यांना त्रास व्हायचा, यापासुन माझी व माझ्या कुटूंबाची सुटका झाली असेच मनावे लागेल. तसेच मला जल जीवन मिशन मधून नळाने पाणी, सौभाग्य योजने मधून विद्युत जोडणी व राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान मधून उपजिविकेसाठी लाभ मिळाला आहे. मला पक्क्या घरकुलासह इतर शासकीय योजनांचा लाभ मिळाल्यामुळे मी आज अत्यंत आनंदी आहे. याकामी ज्यांनी मला सहकार्य केले त्या सर्वांचे मी आभार मानते. असे श्रीमती वर्षा संजयराव खैरे यांनी सांगितले.



श्रीमती वर्षा संजयराव खैरे यांचे आधीचे घर



# राज्य पुरस्कृत पारधी आवास योजनेमुळे मिळाला हक्काचा निवारा

पिढ्यान्‌पिढ्या जंगलात राहणाऱ्या पारधी समाजाला पक्षी-प्राणी व जंगलाचे अफाट ज्ञान आहे. शिकारीवर बंदी असल्याने उदरनिर्वाह करणे काळानुरूप कठीण होऊ लागले. महाराष्ट्रातील पारधी, आदिवासी समाजाची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी, पारधी समाजाचे राहणीमान उंचावण्याच्या दृष्टीने आदिवासी विकास विभागाकडून सन २०११-१२ या वर्षापासून पारधी विकास कार्यक्रम राबवण्यात येत आहे. या विकास कार्यक्रमाच्या अंतर्गत पारधी समाजाला घरकुल, सुशिक्षित बेरोजगार तरुणांना व्यावसायिक प्रशिक्षण तसेच व्यवसाय यासाठी अर्थसहाय्य देणे, पारधी समाजाच्या वस्त्या मुख्य रस्त्यांशी जोडणे असे विकासात्मक कार्यक्रम हाती घेण्यात आले आहेत.

असाच काही प्रयत्न पारधी समाजातील कुटुंबाला राज्य पुरस्कृत पारधी आवास योजनेचा लाभा देवून मुळ प्रवाहात आणण्यासाठी केला आहे. लातुर जिल्ह्यातील खंडापूर ग्रामपंचायतीत श्रीमती कमलबाई शिवराम पवार कुडामातीच्या कच्च्या घरात वास्तव्य करत होत्या. पावसाळ्यात घर गळत असल्याने त्यांचे कुटूंब जीव मुठीत त्रास सहन करत होते. हे पारधी कुटुंब झोपडीत राहूनच दिवाळी व दसरा सारखे सन साजरे करत होते. स्वतःचे घर व आंगणही त्यांच्या मालकीचे नव्हते. आपल्याला हक्काच्या अंगणात रांगोळी कधी काढता येणार, असा प्रश्न या पारधी समाजातील कुटुंबाला पडला होता. गावात लोकांना घरकुलाचा लाभ मिळत असल्याची बातमी श्रीमती कमलबाई शिवराम पवार यांना समजली. त्यांनी ठरवले की काहीही करून यावेळी शासनाच्या घरकुल योजनेचा लाभ घेवून आपल्या कुटुंबाला पक्क्या घरात वास्तव्यास घेवून जायचे.

श्रीमती कमलबाई शिवराम पवार यांनी ग्रामपंचायत कार्यालयात जावून आपली व्यवथा सरपंच व ग्रामसेवकांना सांगितली. तसेच मलाही घरकुल योजनेचा लाभ द्यावा, अशी विनंती केली. सरपंच व ग्रामसेवक यांनी श्रीमती कमलबाई शिवराम पवार यांची घरकुलाबाबतची तळमळ पहाता त्यांच्याकडून आवश्यक ती कागदपत्रे घेवून त्यांचा प्रस्ताव तयार करून ग्रामसेभेची मंजूरी घेतली. पारधी आवास योजने अंतर्गत त्यांचे घरकुल मंजूरीचा प्रस्ताव पंचायत समिती कार्यालयाकडे मंजूरीसाठी पाठविला. त्यानंतर त्या राहात असलेल्या घराची प्रत्यक्ष पहाणी करुन सन २०१६-२०१७ मध्ये पारधी आवास योजने अंतर्गत श्रीमती कमलबाई शिवराम पवार यांना घरकूल मंजूर करण्यात आले. त्यामुळे त्यांना अत्यंत आनंद झाला.

सन २०१६-१७ मध्ये पारधी आवास योजनेतून घरकूल मंजूर झाल्यानंतर श्रीमती कमलबाई शिवराम पवार यांना घरकुलाचे सर्व हप्ते बांधकामाच्या टप्प्यानुसार त्यांच्या बँक खात्यावर जमा झाले. घरकुल बांधकामासाठी त्यांना एकुण रक्कम रूपये १२०,०००/- मिळाले त्यातून त्यांनी पक्के घरकुल बांधले. यासोबतच त्यांना रोजगार हमी योजनेतून रक्कम रूपये १७०८५/- असे एकून रक्कम रूपये १३७०८५/- श्रीमती कमलबाई शिवराम पवार यांना मिळाले.

माझ्या घरकूलाचे बांधकाम पुर्ण असून मी माझ्या सहकुटूंबासह आनंदात राहात आहे. घरकुलासाठी मला सहकार्य करणारे सरपंच, ग्रामसेवक, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता व पंचायत समितीचे लातूरचे सर्व अधिकारी यांची खुप आभारी आहे. या सर्वानी मला पारधी आवास योजनेतून हक्काचे घरकूल देवून मोलाचे सहकार्य दिले असल्याचे श्रीमती कमलबाई शिवराम पवार यांनी सांगितले.





# सर्वांना घरे देवून ग्रामपंचायतीने ठेवला आदर्श

शेवगाव तालुक्याच्या पश्चिमेला १४ किलोमीटर अंतरावर अवनी नदीच्या तीरावर वसलेले आव्हाणे बुद्रूक हे गाव येथील स्वयंभू निद्रिस्त गणपती मंदिरामुळे राज्यभरात प्रसिद्ध असल्याने येथे दर्शनासाठी वर्षभर भाविक येत असतात. गावची लोकसंख्या ३१०० च्या आसपास असून सर्व जाति धर्माचे लोक येथे गुण्यागोविंदाने राहतात.

गेल्या काही वर्षापासून सातत्याने तालुक्याला दुष्काळाच्या झळा बसत आहे. तीव्र पाणीटंचाईच्या काळातही गावाला प्रादेशिक नळपाणी पुरवठा योनेतून थेट जायकवाडी धरणातून पाणीपुरवठा होत असल्याने वाड्यावस्त्या वगळता पाणी टंचाईची झळ गावाला फारसी बसलेली नाही. पर्जन्य छायेच्या प्रदेशात येत असल्याने परिसरात पावसाचे प्रमाण अत्यल्प असल्यामुळे शेतीसाठी मुळा धरणाच्या पाट पाण्यावर अवलंबून रहावे लागते. अशा असंख्य अडचणींवर आणि नैसर्गिक परिस्थितीवर मात करत गावाने कात टाकली आहे.

शासकीय योजनांच्या अंमलबजावणीतून व विकास कामांच्या माध्यमातून गावची प्रगतीपथाकडे वाटचाल सुरु आहे. गावातील पक्क्या घरापासून वंचित असलेल्या व बेघर कुटुंबाना शासनाच्या केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत इतर आवास योजनांच्या माध्यमातून घरकुलाचा लाभ देत गावाने शंभर टक्के उद्दिष्ट गाठले आहे. यातील अनेक लाभार्थ्यांच्या घरांची कामे पुर्ण झाली असून काहींची कामे अंतिम टप्प्यात आहेत. त्यामुळे गाव तालुक्यात व जिल्ह्यात नावारूपास आले आहे.

विविध आवास योजनेतून पक्के घरकुल मिळाल्याने गावातील अनेक कुटुंब सुखी समाधानी झाले आहेत. त्यातील ही काही प्रातिनिधिक उदाहरणे. श्रीमती सुनीता अंबादास कवडे रमाई आवास योजनेच्या लाभार्थी असून त्यांची परिस्थिती हलाखीची असल्याने राहायला घरच नाही तर त्यासाठी जागाही उपलब्ध नव्हती. घरदार नसल्याने लग्नाचे वय झालेल्या दोन्ही उपवर मुलींचे लग्न जमत नव्हते. ग्रामपंचायतीने जागा उपलब्ध करून देऊन रमाई आवास योजनेतून घरकुल दिल्याने पक्क्या घरात राहायला गेल्यानंतर पाहुण्या रावळ्यात प्रतिष्ठा मिळाली. मुलींची चांगल्या घरात लग्न झाली.

श्रीमती संजीवनी देविदास शिंदे प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीणच्या लाभार्थी असून पक्के घर नसल्याने पाण्यापावसाच्या दिवसात छपरातून टिपटिप पाणी गळायचे. घरात बसण्यासाठी सुद्धा जागा कोरडी मिळत नव्हती. त्यामुळे पाऊस सुरू झाला की, घरातील भांडीकुंडी गळक्या छताखाली ठेवण्यासाठी व जागा कोरडी राखण्यासाठी धडपड करावी लागायची. आता प्रधानमंत्री आवास योजनेतून पक्के घर मिळाल्याने समाधानी आहेत.

गावातील प्रत्येक घटकातील, विविध स्तरातील लोकांना शासनाच्या विविध विभागातील योजनांच्या माध्यमातून न्याय देण्यात आव्हाणे बुद्रुक ग्रामपंचायत अग्रेसर असून इतर गावांसाठी मार्गदर्शक ठरली आहे. त्यांच्या या विकास कामांमुळे मॉडेल ग्रामपंचायत म्हणून ओळख निर्माण झाली आहे. तसे पहायला गेले तर अहमदनगर जिल्हा हा आदर्श व मॉडेल ग्रामपंचायतीसाठी ओळखला जातो. परंतु विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या लाभार्थ्यांना हक्काचे घरकुल देण्यासाठी ग्रामपंचायतीने दिलेले योगदान व ग्रामस्थांचे सहकार्य यामुळे आव्हाणे बुद्रुक ग्रामपंचायतीचे सर्वस्तरावरून कौतुक होत आहे. ग्रामपंचायतीच्या या यशाचे श्रेय सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामसेवक, ग्रामस्थ व विविध योजनांच्या लाभार्थ्यांना जाते.






# रमाई आवास योजनेमुळे घरकुल वसाहतीची निर्मिती

कोल्हापूर जिल्ह्यातील भुदरगड तालुक्यांतर्गत ग्रामपंचायत म्हासरंग मध्ये श्री. दयानंद मसू चव्हाण, श्री. रामचंद्र जवष्णू चव्हाण, श्री. बाळू तातोबा चव्हाण, श्री. अरुण काशीबा चव्हाण, श्री. रामचंद्र मारुती चव्हाण, श्री. सुनील शामराव चव्हाण, श्री. प्रकाश भीमराव चव्हाण, श्री. सुभाष बचाराम चव्हाण, श्री. रववद्र बाळू चव्हाण, श्री. सचिन बराम चव्हाण, श्री. राजाराम लक्ष्मण चव्हाण, श्री. गणेश प्रकाश चव्हाण, श्री. सुरेश पांडुरंग चव्हाण, श्री. श्रावण हरी चव्हाण, श्री. अनिल शामराव चव्हाण, श्री. आनंदा बाळू चव्हाण, श्री. उत्तम रामचंद्र चव्हाण, श्री. श्रावण अप्पा चव्हाण, श्री. मंगेश मारुती चव्हाण व श्री.सदानंद गणू चव्हाण रहिवासी आहेत.

या सर्वांचे म्हासरंग गावात राहत असलेली घरे मातीचे, साधे कच्चे व कौलारूचे होते. हे सर्व दुर्गम डोंगराळ भागात राहत असल्याने त्या भागात पावसाचे प्रमाण अतिजास्त असते. त्यामुळे पावसाळ्यात घरामध्ये राहताना खूप त्रास सहन करावा लागत होता. घरामध्ये खूप ठिकाणी पाणी गळत होते. हे सर्वजन अल्पभूधारक शेतकरी असून शेती हा त्यांचा व्यवसाय आहे. त्यातून अत्यल्प उत्पन्न मिळत असल्यामुळे ते लोक पक्के घर बांधू शकत नव्हते.

घरकुल योजनांबाबत माहिती घेण्यासाठी म्हासरंग गावचे हे सर्व लोक पंचायत समिती भुदरगड येथे आले. यावेळी या सर्व ग्रामस्थांना पंचायत समिती कार्यालयाकडून राज्य शासनाकडून मागासवर्गीसाठी असलेल्या रमाई आवास योजने विषयी सविस्तर माहिती देण्यात आली. तेसच या योजनेचा लाभ घेण्यसाठी आवश्यक कागदपत्रांची यादी देवून पुर्तता करण्यास सांगितली. त्यानुसार हे सर्व ग्रामस्थ आवश्यक कागदपत्रासह रमाई आवस योजनेचा लाभ मिळण्यासाठी ग्रामपंचायत भुदरगड जावून विहीत नमुन्यात घरकुल मागणी अर्ज सादर केला. ग्रामपंचायतीने याविषयी दखल घेवून ग्रामसभेच्या मंजूरीसह या सर्वांचा रमाई आवास योजनेतून घरकुलाचा परिपूर्ण प्रस्ताव पंचायत समितीकडे मंजूरीसाठी सादर केला.

यासर्व लोकांच्या घरांची स्थळ पाहणी करून त्यांना सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग अर्थसहाय्यीत रमाई आवास योजनेतून घरकुलांना मंजूरी देण्यात आली. घरकुलांना मंजूरी व पहिला हप्ता मिळताच या सर्व लाभार्थ्यांनी घरकुलाच्या कामाला सुरूवात केली. घरकुल बांधकामाच्या टप्प्यानुसार त्यांना घरकुल बांधकामाकरीता सर्व हप्त वेळेत मिळाल्याने त्यांनी लवकरच शौचालयासह घरकुलाचे बांधकाम पूर्ण केले. घरकुल बांधकामाकरीता या सर्व लाभार्थ्यांना प्रत्येकी रक्कम रूपये १,२०,०००/- मिळाले. त्यासोबतच रोजगार हमी योजनेतून प्रत्येकी रक्कम रूपये २०,०००/- मिळाले. वेळेत मिळालेल्या अर्थसहाय्यामुळे या सर्वांनी एकाच ठिकाणी २१ घरकुलांची बांधकामे पूर्ण केली असल्याने त्यांच्या घरकुलांना चव्हाण वसाहत (गल्ली ) म्हणून ओळखले जात आहे.

या सर्व घरकुल लाभार्थ्यांना घरकुला सोबतच इतर शासकीय योजनांच्या कृती संगमातून शौचालय, गॅस कनेक्शन, विद्युत जोडणी, पिण्याच्या पाण्यासाठी नळ कनेक्शन व इतर मुलभूत नागरी सुविधांचा लाभ मिळाला आहे. आज हे सर्व लाभार्थी त्यांच्या कुटुंबांसह रमाई आवास योजनेमुळे मिळालेल्या घरकुलास आनंदी व समाधानाने वास्तव्य करत आहेत. त्यांना मिळालेल्या हक्काच्या व पक्क्या घरकुलासाठी त्यांनी शासनाचे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, पंचायत समिती व ग्रामपंचायत कार्यालयाचे सर्व अधिकारी, पदाधिकारी व कर्मचारी यांचे आभार मानले आहे.





# पालघर जिल्ह्यात भुकंप रोधक घरकुलं

पालघर जिल्ह्यात डहाणू, जव्हार, मोखाडा, पालघर, तलासरी, वसई, विक्रमगड व वाडा ह्या ८ तालुक्यांचा समावेश आहे. सध्या तलासरी व डहाणू तालुक्याला भूकंपाचे झटके २०१८ पासून बसत आहे. या तालुक्यांना ३.९ ते ५.०० रिक्टर स्केल असतो. अशा भागात असलेली सर्व यंत्रणा व नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून जनजीवन विस्कळीत होत आहे. डहाणू व तलासरी तालुक्यातील ग्रामपंचायतींमध्ये भूकंपाचे अति तीव्र झटके येत असून या ग्रामपंचायतीमध्ये विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांचे लाभार्थी आहेत.

राज्य व्यवस्थापन कक्ष- ग्रामीण गृहनिर्माण व IIT मुंबई यांच्या समन्वयाने राज्यातील सर्व ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांना तांत्रिक दृष्ट्या अधिक सक्षम करून भूकंप प्रवण क्षेत्रात घरांची बांधणी कशी असावी या विषयी प्रशिक्षण देण्यात आले आहे.

पालघर जिल्ह्यामध्ये याच तंत्रज्ञानाचा वापर करून लाभार्थ्यांचे घरकुल बांधण्यास सुरुवात केली. प्रशिक्षणांतर्गत Confined Masonry चा वापर करून घर बांधायचे कसे ते सांगण्यात आले. या बाबत डहाणू व तलासरी तालुक्यातील ग्रामीण गृह निर्माण अभियंता यांनी लाभार्थ्यांना मार्गदर्शन केले. रक्कम रुपये १,२०,०००/- मध्ये Confined Masonry चा वापर करून घर पूर्ण होऊ शकत नाही असे ग्रामीण गृह निर्माण अभियंता यांच्या लक्षात आले.यामुळे घरकुल बांधकामस लाभार्थ्यांना अडचण निर्माण झाली. यापैकी काही लाभार्थ्यांनी रक्कम रूपये १,२०,०००/- व्यतिरिक्त आपल्या जवळची रक्कम वापरून किंवा MSRLM (उमेद) अभियानातील रक्कम कर्ज स्वरूपात घेऊन Confined Masonry च्या प्रकारे ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांच्या मदतीने घरकुले बांधण्यात सुरु केले. लाभार्थी Rainforce Cement Concrete (RCC) घर बांधण्यासाठी इच्छुक होता. घर बांधण्याची जागा सर्वप्रथम पाहणी करून लाईन आऊट देण्यात आले. जोता बांधण्यासाठी २-३ फूट खोल लाईन आऊट प्रमाणे खोदण्यात आले. त्या नंतर Plain Cement Concrete (PCC) जमिनीला करून काही लाभार्थ्यांनी दगड आणि सिमेंटचा वापर करून जोते बांधले आणि काही लाभार्थ्यांनी Concrete Ring फिरवली त्यानंतर आतील भागात खोदकामातून निघालेली माती व दगड भराव टाकून त्यावर Concrete Bed तयार करून जमिनीच्या समान करून घेतले. जेणे करून भूकंप आल्यास संपूर्ण भार Concrete Ring वर येईल आणि घराचे जास्त नुकसान होणार नाही. पुढे Confined Masonry च्या सहाय्याने संपूर्ण घर बांधण्यात आले. आता भुकंपाचे धक्के लागले तरीही त्या घरांना भेगा पडलेल्या नाही. अश्या पद्धतीने लाभार्थ्यांनी Confined Masonry चा वापर करून बांधलेले घरे बघून ग्रामपंचायत मधील इतर नवीन मंजूर लाभार्थ्यांनी अशी घरे बांधण्यास सुरुवात केली आहे.

तलासरी तालुक्यात श्री. सचिन ईभाड, श्री. संजय गुरोडा, श्री. सुरज यादव व श्री. योगेश माच्छी हे ग्रामीण गृहनिर्माण अभियंता कार्यरत आहेत. त्याचप्रमाणे डहाणू तालुक्यात श्री. मनीष पाटील, श्री.संतोष चौरे, श्री. हेमंत मोहिते व श्री. मनोज भोये हे ग्रामीण गृहनिर्माण अभियंता कार्यरत आहेत. या ग्रामीण गृहनिर्माण अभियंत्यांनी राज्य व्यवस्थापन कक्ष- ग्रामीण गृहनिर्माण व IIT मुंबई यांच्या समन्वयाने आयोजित केलेल्या प्रशिक्षणाचा योग्य वापर करून पालघर जिल्ह्यात भूकंप रोधक घरकुलांची निर्मिती करून एका नवीन तंत्रज्ञानाची ओळख पालघर जिल्ह्यालाच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्राला दिली आहे. त्यांच्या या उपक्रमाबद्दल सर्वस्तरावरून त्यांचे कौतुक होत आहे.

डहाणू व तलासरी तालुक्यातील पक्क्या घराचे स्वप्न बाळगणारे विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांचे लाभार्थी आता स्वतःच्या पक्या भूकंप रोधक सुरक्षित घरात आनंदाने वास्तव्य करीत आहे. शासनाच्या या भुकंप रोधक घरकुल बांधकामाच्या तत्रज्ञानासाठी घरकुल लाभार्थ्यांनी शासनाचे व ग्रामीण गृहनिर्माण अभियंत्यांचे मनःपूर्वक आभार मानले आहे.




महाआवास अभियान २.०








MAHAPREIT


स्वातंत्र्याचा
मा.ना.श्री.उदयजी सामंत


जिल्हाधिकारी कार्यालय वाशिम
सत्यमेव जयते





जळगाव येथे मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता, श्री.गुलाबराव पाटील यांचे शुभहस्ते महा आवास अभियान पुरस्कार वितरण




जालना येथे मा. मंत्री, कृषी, श्री. अब्दुल सत्तार यांचे शुभहस्ते महा आवास अभियान पुरस्कार वितरण



उस्मानाबाद येथे मा. मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, डॉ. तानाजी सावंत यांचे शुभहस्ते महा आवास अभियान पुरस्कार वितरण



यवतमाळ येथे मा. मंत्री, अन्न व औषध प्रशासन, श्री. संजय राठोड यांचे शुभहस्ते महा आवास अभियान पुरस्कार वितरण

“महाराष्ट्र शासनाचा एकच ध्यास,
२०२४ पर्यंत सर्वांसाठी आवास”





## संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय

४ था मजला, दक्षिण कक्ष, सिडको भवन, सी. बी. डी. बेलापूर, नवी मुंबई - ४००६१४

Email ID : directoriayruralhousing@gmail.com

दुरध्वनी क्र. : ०२२-२७५६१८२४